-न्याय-चातुर्य-कथा-

[-२-]

# जलदेवतेचा न्याय

२ -आणि इतर कथा- ७ आणे




अमर ज्योति वाङ्मय

रघुवीर सामंत संपादित

# अमर

— ज्योति ... व...

थाट ... काढणें, 'या
...व मे...
टोंचणी ...
बसा' म्हणणें, तोंडा... आल्या पावलीं
जाणें, शब्दानें शब्द... नव्या ... गोष्ट ... चुरशीला
पेटणें, अ...लें म... मुलींच्या हात... एखा-
... करमणूक ... त्याचप्रमाणें ...
अधिक ... रसिक बन... आहे!

* ... व असलीं पद्धतशीर पुस्तकें ... प्रसिद्ध ...ण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन... चे ... चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

## ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

I न्याय-चातुर्य-कथा
(किशोर श्रेणी)
१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा
२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा
३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा
४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

II सत्यकथा—
(कुमार श्रेणी)
१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा
२ शूरांचा गांव आणि इतर कथा

III अभिनय-गीतें
(किशोर श्रेणी)
१ गीत ज्योती

IV दीर्घ-कथा
१ कांहीं कमळें

V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी
(कुमार श्रेणी)
१ चार वीर
२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

VI शास्त्रीय कुतूहल.
१ माणसाचें शें...

कुमार श्रेणी

VII वाङ्मयीन चर्चा.
१ 'मी लेखक ...

...ठाविलकर लिथो, ... मुंबई ...

## ‘अमर ज्योति वाङ्मय’

(१) ५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत **जाहीर केल्याप्रमाणें**, प्रस्तुत (‘ज्योति-सामंत-स्मारक’) संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

(२) प्रत्यक्ष कार्याला अवधि फार थोडा; कागद-छपाई-महर्गता-नियंत्रणें इत्यादींची प्रतिकूल परिस्थिती; पण असल्या अनेक अडचणींतून वाट काढून, वर उल्लेखिलेल्या पत्रकांत **कल्पिलेल्या एकूण अठरा पुष्पांपैकीं शेवटीं फक्त बारा पुष्पेंच** कां होईनात, तेवढी तरी बालक-जगाला सादर करणें आम्हाला शक्य होत आहे. या बारा पुष्पांपैकीं (तीन पुष्पें थोडी अपूर्ण मुद्रित असल्यामुळें) **आज धनत्रयोदशीला आम्ही फक्त नऊ पुष्पेंच प्रकट करीत आहों. तीं उरलेलीं तीन, ५ डिसेंबर १९४४ रोजीं आम्ही बाल-रसिकांच्या हातीं देऊं शकूं, अशी आम्हाला खात्री आहे.**

आपल्यापुढें असलेल्या या पुष्पांचें चोखंदळ रसिक पालकांनीं एकदां अवलोकन केल्यावर—**आपल्या बालकांना तीं सर्व दृष्टीनें फार आवडतील, त्यांना उद्बोधक व साहाय्यक होतील,** अशी त्यांची खात्री होईल, यांत आम्हाला संदेह नाहीं.

(३) **उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें ‘**मनोरंजक**’ व ‘**ज्ञान**’ असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें-१) ‘**शिशुश्रेणी**’ (वय वर्षें ७ पर्यंत), (२) **बाल-श्रेणी**’ (वय वर्षें १२ पर्यंत,) (३) ‘**किशोर श्रेणी**’ (वय वर्षें १४,) व (४) ‘**कुमार-श्रेणी**’ (वय वर्षें १७ पर्यंत) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या-टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

किशोर-श्रेणी ........................ ......न्याय-चातुर्य-कथा

[मनोरंजन] — २ —

# जलदेवतेचा न्याय !

आणि

## इतर कथा

— लेखक —


श्री. रघुवीर सामंत
बी. ए. बी. टी. (ठाणें)

श्री. शांताराम बी. सबनीस
एम्. ए. बी. टी. (बडोदें)


रघुवीर सामंत संपादित

अमर

ज्योति वाङ्मय

[२]


मूल्य ७ आणे ] धनत्रयोदशी १८६६ [ प्रथमावृत्ति

थाट उडणें, स्वतः जातीनें जाणें, हातीं शुभ नारळ देणें, एखादा मनुष्य देव भेटणें, घरांत लग्न निघणें, एखाद्या गोष्टीला कोणी न विचारणें, मनाला टोंचणी लागणें, डुमणें लावणें, एखाद्या गोष्टीची भाषा न काढणें, 'या बसा' म्हणणें, तोंडांत शेण घालणें, जीव घेऊन जाणें, आल्या पावलीं जाणें, शब्दानें शब्द वाढणें, एखादी गोष्ट उकिरड्यावर पडणें, चुरशीला पेटणें, आपलें मन साक्ष देणें, एखाद्याच्या वाटेला कधीं न जाणें, एखाद्याच्या नडीला मदत करणें, एखाद्या दिव्यांतून पार पडणें, एखा[illegible]चें सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट दिसणें, एखादा मनुष्य घमेंडींत जाणें, एख[illegible]र भीक घालणें, तोंडून ब्रही न काढणें. [ २ ] ढुंकूनही न पहाणें, उन्हातान्हांत खपणें, मशागत करणें, धुमाकूळ माजवणें, मिळसें घेणें, भलत्या थराला गोष्ट जाणें, मालकी गाजवणें. [ ३ ] एखादी गोष्ट लीलेनें करणें, डरकाळ्या फोडणें, कानठळ्या बसणें, काडी इतकीही किंमत नसणें. [४] पल्ला गांठणें, प्रसंग ओळखणें. [५] एखादी गोष्ट काबूंत ठेवणें. कपाळावर हात घेऊन बसणें. [६] एखाद्याला सळो कीं पळो करणें, [७] जीव धोक्यांत घालणें, हृदय द्रवणें, अभय देणें.

## II कथानक, कल्पना, कला वगैरेचा अभ्यास—

[ १ ] ( i ) या गोष्टीची सुरवात निराळीच केली आहे. म्हणजे कशी ? विचार करा. ( ii ) रामजी पाटलाचा स्वभाव दाखवणारीं वाक्यें शोधून काढा. ( iii ) न्यायाधीशानें चाणाक्षपणा कसकसा दाखवला तें प्रत्येक प्रसंगाचा विचार करून स्पष्ट करा. ( iv ) कृष्णंभटाचें स्वभावचित्र स्वतःच्या शब्दांत लिहा. ( v ) गांवच्या लोकांच्या वागणूकीबद्दल तुमचें मत काय झालें ? ( vi ) गोष्टीला आहे तें नांव योग्य आहे कां ?—दुसरें कांहीं देतां येईल कां ? [ २ ] ( i ) श्रीपतीनें जमिनीच्या मालक शेठजींना कोणत्या गोष्टीचा उपयोग करून वठणीवर आणलें ? ( ii ) 'श्रीपतीचें दारिद्र्य', 'शेठजींची पहिली भेट,' 'पहिल्या वर्षं अखेर अखेर,' व 'दुसऱ्या वर्षाअखेरची तडजोड' असे चार भाग कल्पून ( एक दोन पात्रें भरीला घेऊन ) एक चार अंकी छोटें नाटक तुमच्या संमेलनासाठीं तयार करा. [ ३ ] ( i ) त्या सरदाराची वागणूक तुम्हाला पसंत पडली कीं नाहीं ? सकारण स्पष्ट करा. ( ii ) सरदारकन्यकेनें त्या सरदाराची तशी परीक्षा घेण्यांत काय चुकलें ? [४] ( i ) 'चोराची चोरी' हें नांव तुम्हाला योग्य वाटतें कां ? ( ii ) त्या इमानी नोकरानें चोराला कसें चकवलें ? [ ५ ] त्या राजबिंड्या घोडेस्वारानें म्हाताऱ्या शेतकऱ्याला सांगितलें तें बरोबर कसें ? [ ६–७–८ ] या तीन्ही गोष्टींत तुम्हाला चातुर्य कुठें आढळलें ?

तथापि, दरवर्षी होणाऱ्या या ' दिपावली प्र...
गटाची व्याप्ती सर्व विभागांपर्यंत व सर्व टप्प्यां-श्रेणी ...
... प्रकाशनाला मिळणाऱ्या रसिकाश्रय..., संस
... वर व त्या त्या वेळच्या ...वताल... उ
...बून रहाणार, ह...
होइल... कमीत कम...
...रुण दर... ळांत संस्था करूं शकेल...
... इच्छा-आकांक्षा आहे. ... ला. तशी उमेद ...

(४) ... संस्थेच्या कार्यांत ...चा विशेष दृष्टी नसली तरी ...हार सं...ळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. **संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षाचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार.** तेव्हां (संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी) **आम्ही ' कायम ग्राहकत्वा 'ची योजना उपयुक्त म्हणून मुक्रर केली आहे.** पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी **ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल.** आणि ती पुन्हां **सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल.** शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें **फक्त मामुली चार आणे प्रवेश फी** घेऊन कोणत्याही मुलामुलीस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षींचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतली तर ती त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाची पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** **अमर-ज्योति वाङ्मया**'ला आश्रय मिळवून देऊन, उत्तम लेखन साहाय्य करून, उपयुक्त व आवश्यक अशा नवीन प्रकाशनाबाबत कल्पना सुचवून वगैरे हस्ते परहस्तें जी. जी. सक्रीय मदत केली जाईल त्याबद्दल त्या त्या आस्थेवाईक हितचिंतकांची संस्था सदैव ऋणीच राहील.

विनम्र-**चालक**


जलदेवतेचा
न्याय

( किशोर-किशोरींशीं ) **हितगुज** ★ [ न्याय-चातुर्य-कथा
१-२-३-४ ]

या कथांपैकीं प्रत्येक तुम्ही आवडीनें वाचाल, अशी मला उमेद आहे. मात्र एकच सूचना देऊन ठेवीत आहें. प्रथम मनोरंजनासाठीं त्या वाचल्यात, कीं, मागाहून पुस्तका-शेवटीं जोडलेल्या पुरवणी-परिशिष्टाचा उपयोग करून भाषेच्या-रचनेच्या व कल्पना-विचारांच्या दृष्टीनें त्या पुन्हा वाचून त्यांचा अभ्यास करा. त्यामुळें तुमचा फायदा झाल्यावांचून रहाणार नाहीं.

तुमचा—**संपादक**
"अमर ज्योति वाङ्मय"

( पालकांशीं ) **खाजगी** ★

तुमच्या गोड बालकांच्या हातीं या गोष्टी हेतु-पुरस्सर देत आहें. या गोष्टी निर्भेळ स्वतंत्र मुळींच नाहींत. त्यांतील मध्यवर्ती कल्पना अगर क्वचित् सगळी गोष्टच्या गोष्टहि तुमच्या पूर्वी वाचनांत आली असेल. पण आमची मुख्य दृष्टि रचना, मांडणी, भाषा इत्यादि बाबतींत बालकांवर संस्कार करण्याची आहे. त्या दृष्टीनें हें पुस्तक विकत घेऊन आपल्या बाळगोपाळांच्या हातीं देऊनच आपण संतुष्ट होऊं नये. नम्र विनन्ति अशी, कीं, त्यांनीं पुस्तकाशेवटच्या परिशिष्टाचाहि उपयोग केला आहे, कीं नाहीं तें पहावें. आपल्याला कांही सूचना कराव्याशा वाटल्या तर जरूर कराव्यात.

आपला नम्र,
**संपादक**
"अमर ज्योति वाङ्मय"

---

[ सर्व हक्क प्रकाशका-स्वाधीन ]

—: मुद्रक :—

**अनंत वा. देसाई**, एम्. ए.
लोयल प्रिंटिंग प्रेस,
१३-१९ हमाम स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

—: प्रकाशक :—

सौ. **स्नेहल सामंत**, पी. ए.
चालक, 'अमर ज्योति प्रकाशन'
१४ बी. हरजीवनदास एस्टेट
व्हिन्सेन्ट रोड : दादर :
मुंबई १४.

तो मात्र उगीच बडबड करीत नव्हता. शांतपणें एका बाजूस बसला होता. फारच झालं तर विचारणाऱ्या माणसाला तो म्हणायचा— " मला माहीत आहे बरं, सारं गांव असाच वेडा न्याय देणार तें ! आणि म्हणूनच तर मी माझी भिस्त न्यायाधीशांच्या न्यायीपणावर, चातुर्यावर ठेवली आहे. आतां मी तर निश्चिंत आहे अगदीं ! "

## २

पण तें कृष्णंभट–रामजी पाटील यांच्यामधलं भांडण तरी कसलं होतं तुम्ही म्हणाल ?—

सांगितलं तर हंसाल तुम्ही !–तुपाच्या दोन हंड्यांबद्दलचा तंटा होता तो.

कृष्णंभटाची अशी तक्रार होती, कीं, " रामजी पाटलांच्या मुलीचं लग्न निघालं, सहा महिन्यांपूर्वीं; तेव्हां, त्यांनीं महिन्याच्या बोलीनें, तुपाचे दोन हंडे माझ्याकडून उसने नेले होते. आतां श्रीमंत रामजी पाटील फिरले आहेत. सरळ नेलेच नाहींत असं म्हणतात; मला गरिबाला खोटं पाडतात ! "

त्याच्या गांवचे सगळे लोक खो खो हसूंच लागले.

कारण कृष्णंभटाकडे सगळी एक म्हैस. तो एकटा जीव घरांत. रामजी पाटलांकडे सात म्हशी, हाताखालीं दोन गडी घरांत.

आणि साक्ष नाहीं, लेखी पुरावा नाहीं; आतां कृष्णंभट एकदम उठतो नि वेडा म्हणतो–" सात म्हशीवाल्या रामजी पाटलांनीं एक म्हैस-वाल्या आपल्याकडून दोन हंडे तूप उसन्या बोलीनें नेले ! " कोण खरं मानील तें ?....

रामजी पाटील मोठे म्हणून सारे लोक त्यांच्या बाजूनें बोलत होते; नि वरवर पाहिलें तर कोणालाहि तसेंच वाटलें असतें ! हें खरें; पण खरी वस्तुस्थिति मात्र अगदीं निराळी होती—



## ३

कृष्णंभट नि रामजी पाटील शेजारीं शेजारीं रहात असत.

रामजी पाटलाकडे सात म्हशी नि दोन गडी असले, तरी ते उंटावरून शेळ्या हांकणारे होते. अगदी उथळे होते; ख्यालीखुशालींत चैनीनें रहाणारे होते.

कृष्णंभटाकडे एकच म्हैस होती खरी; तरी तो स्वतः निढळाचा घाम काढून जातीनें खपायचा. तो काटकसरी होता; हिशेबी नि संसारी मनुष्य होता.

रामजी पाटील नेहमीं दशावतार–गंजिफा खेळत बसायचे. गड्यांना मधून मधून हुकूम सोडायचे. नेहमीं चार चौघांना बोलावून श्रीखंड–बासुंदीचे बेत करायचे.

आणि त्यांचे गडी ? आपल्या धन्याचें लक्ष नाहीं, म्हणून, तेहि अळंटळं करायचे–आळसानें झोंपून रहायचें. आज काय म्हणे–'दोन म्हैशींचीं वासरें सुटलीं, दूध प्यालीं;' उद्यां काय म्हणे–'म्हैशीनें चरवीवर लाथ मारली;' परवां काय म्हणे–' दूध ऊतू गेलें किंवा नासलें' असें नेहमीं चालायचें.

मग लोण्या-तुपाचा सांठा होणार तरी कसा रामजी पाटलांकडे ?—

उलट, कृष्णंभट मात्र, एकटा होता तरी प्रत्येक बाबतींत काळजी घ्यायचा स्वत; आणि म्हणूनच, थोडें थोडें करतां करतां, मोठ्या श्रमानें काटकसरीनें दोन हंडे तूप सांठवलें होतें त्यानें !—

पण त्याबद्दलच, ' खा–पी–मजा कर ' असें वागणारे त्याचे शेजारी रामजी पाटील, कृष्णंभटाची वेळीं अवेळीं थट्टा करीत. त्याला स्वार्थी, एकलकोंडा, आप्पलपोटा, कंजूष अशी विशेषणें देत—

त्यावर कृष्णंभट मात्र तोंडांतून चकार शब्दही काढीत नसे.

आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गानें, आपल्या उद्योगांत तो अगदीं चूर असे. बरें, त्याला कशाकरतां कोणाकडे कधी हात पसरायची किंवा

तोंड वेंगाडायचीही संवय नव्हती. तो म्हणे–' रोज दोन वेळ कष्टाची मीठभाकर देणारी आपली गरीबी बरी, कीं आपण बरे ! '

## ४

असेच दिवस चालले होते. एके दिवशीं रामजी पाटलांकडे सनई-चौघडे वाजूं लागले. त्यांच्या घरां त्यांच्या मुलीचें लग्न निघालें होतें.

रामजी पाटलांनी सर्व बड्या बड्या लोकांना वाजत गाजत अक्षता वाटून आमंत्रण दिलें.

पण कृष्णंभटासारख्या गरीबाला त्यावेळीं, मुद्दाम कोण विचारतो ?–

पाटलांच्या घरांत तर पक्वान्नांची घालमेल चालली होती. लाडू, करंज्या, जिलब्या, मांडे, घीवर....! रामजी पाटलांच्या दर्जाला शोभेसाच मुलीच्या लग्नाचा थाट उडायला पाहिजे होता ना ?

पण अगदीं मेजवानीच्या दिवशीं, ऐन वेळीं रामजी पाटलांच्या लक्षांत आलें, ' जांवईबापूंच्या विशेष पक्वान्नांसाठीं नि अनुशुधीसाठीं साजूक तूप नाही आपल्याकडे !'

त्यांच्या डोक्यांत एकदम एक कल्पना आली. त्यांनीं पागोटें चढवलें; नि स्वतः जातीनेंच ते कृष्णंभटाकडे गेले शेजारीं....

## ५

घराच्या परसांत, कृष्णंभट पंचा लावून म्हैस धूत होता. तेथें पाटील स्वतः गेले नि हंसत हसत सारवासारव करूं लागले, " कृष्णंभटजी ! कालच्या साऱ्या गडबडींत, अगदीं शेजारीं तुमच्याकडे आमंत्रणाला यायचं मात्र साफच राहून गेलं–त्याबद्दल राग मानूं नका !.... लग्नाला या तुम्ही ! ब्राह्मणांनीच स्वयंपाक केला आहे. ब्राह्मणांची पंगत निराळी खास आहे. तुम्ही आलंच पाहिजे बरं कां लग्नाला, नि जेवणावळीला ?"



आपल्या गांवचे हे पाटील ! अगदीं स्वतःच आमंत्रणाला आल्यावर, कृष्णंभटाला आनंद कां बरं होणार नाहीं ? त्यानें टोपी घालून रामजी पाटलांच्या हातीं शुभ नारळ दिला व पाटलांचें आमंत्रण आनंदानें स्वीकारलें.

पण रामजी पाटील परत फिरतां फिरतां मात्र जरा घुटमळले. कृष्णंभटाला प्रथम समजलें नाहीं, 'कां' तें; तेव्हां त्यांनीं आस्थेनें कारणाबद्दल चौकशी केली.

त्यावर रामजी पाटील म्हणाले, " अहो, हा लग्नाचा बोवाळ मोठा वाईट बुवा. घरांत सात म्हशी आहेत. पण आतां वेळेवर साजूक तूप पाहिजे म्हटलं, तर घरांत थेंब नाहीं आज ! काय करावं मोठा प्रश्नच पडला आहे...."

' पाटलांच्या त्या लग्नघाईत, आपण त्यांना उपयोगी पडणं, हें आपलं शेजारधर्मीचं कर्तव्य आहे. ' असें कृष्णंभटाला वाटलें. आणि तो पटकन् म्हणाला–" अहो त्यांत काय आहे पाटील ?—थोडं थोडं करून माझ्याकडे चांगले दोन हंडे तूप झालंय. त्यांतलं जा कीं घेऊन, पाहिजे तर थोडं !"

आणि पाटलांना तेंच तर पाहिजे होतें. ते एकदम आनंदून कार्यसाधूपणें म्हणाले—" होय ना ?....वा वा....भटजी, देव भेटलांत बुवा तुम्ही !—मला तुमचे दोन्ही हंडेच द्या ना उसने आज ! कारण वेळेवर किती लागेल याचा आतांच अंदाज करतां येत नाहीं ! महिन्याभरानें मात्र मी परत करीन तुमचं ! अहो, त्यांत काय आहे ?....सात म्हशी आहेत माझ्या ! आतां लग्न निघालं घरांत म्हणून एवढी धडपड ! नाहींतर कोण तुपाला विचारीत होतं ?—"

कृष्णंभटानां पाटलांच्या त्या दिमाखाचा मनांत थोडा राग आला; पण कांहीं न बोलतां घरांतले दोन्ही हंडे त्यांनीं पाटीलबुवांच्या पुढें केले; आणि म्हटलें, " तुमची आजची नड तर भागतय ना माझ्या तुपामुळें ?

मग त्यांत मला आनंदच आहे ! पण महिन्याभरांत परत करा हो मात्र तें ! माझ्या गरीबाचा हा पोटाचा धंदा, एकट्या म्हशीवर चाललेला..."

"होहो, काळजी नको तुम्हाला अगदीं ! बरं !....या बरं भटजी लग्नाला नि मेजवानीला ! नाहींतर रागावेन् मी तुमच्यांवर ?"

पाटील एवढें बोलले नि आपल्या गड्यांकरवी ते हंडे घेऊन आपल्या घरीं निघून गेले.

## ६

पाटील बुवांकडचें लग्नकार्य निर्विघ्न पार पडलें.

मग त्यांचा पुन्हां नेहमींचा कार्यक्रम सुरूं झाला.

सुरुवाती सुरवातीला कृष्णंभटाचे उसने घेतलेले तुपाचे हंडे परत करण्याची पाटीलबुवांच्या मनाला टोंचणी लागे. पण पूर्वींची उधळमाधळ एकाएकी थांबणार होती थोडीच ! मग सात म्हशी घरांत असल्या तरी तूप सांठणार कसें ?

महिन्यांमागून महिने जाऊं लागले; शेवटीं तर त्यांना दुसराच विचार सुचूं लागला.

ते मनांत म्हणूं लागले " आपण तर गांवचे पाटील !–गांवातल्या साऱ्यांची नेहमीं काळजी घेतों ! मग काय झालं एखाद्या वेळीं कृष्णंभटानें दोन हंडे तूप दिलं आपल्याला तर ?–ऐवीतेवी तुपाचा सांठा आपल्या घरीं होतच नाहीं ! मग मी एकदम 'घेतलंच नाहीं' असं म्हटलं, तर तो काय करणार आहे बेटा ?–लोकांना माझंच खरं वाटणार !–"

आणि या विचारानें, शेवटीं, पाटील साफ बेफिकीर झाले ! कृष्णंभटाचे उसने आणलेले तुपाचे हंडे पार विसरले !

कृष्णंभट मात्र अगदीं सज्जन होता. 'आज नाहीं उद्यां देतील पाटील आपलं तूप' असा विचार करून, तो कधीं पाटलांकडे चुकूनसुद्धां टुमणें लावायला गेला नव्हता !



## ७

पण शेवटीं, त्याचाही नाइलाज झाला ?–'लग्नकार्य उरकून चांगले सहा महिने झाले; तरी रामजी पाटील, अजून नेलेलें तूप परत करण्याची भाषाच काढत नाहींत !' हें पाहून, एके दिवशीं दुपारीं, कृष्णंभट जरा दबकत दबकतच पाटलांच्या वाड्यांत शिरला.

मित्रमंडळीबरोबर, पाटील दशावतार खेळत बसले होते. कृष्णंभटाला ओटीवर चढतांना पाहून, जणुं काय, 'आपला–त्याचा संबंधच नाहीं' अशा तोऱ्यानें, पाटलांनीं त्याच्याकडे पाहिलें. त्याला 'या बसा' देखील म्हटलें नाहीं.

थोडया संकोचानें, उभ्या उभ्याच कृष्णंभट म्हणाला, "पाटील, जरा खाजगी बोलायचंय् तुमच्याशीं मला...."

आपल्या मित्रमंडळीकडे एकदां पाहून, खेळतां खेळतां वर नजर करीत पाटील बेफिकीरीनें म्हणाले—"तुमचं–नि माझ्याशीं खाजगी काम ? तें काय असणार बुवा ? सांगा की इथेंच."

तेव्हां मात्र कृष्णंभटाचा निरुपाय झाला.

आपल्या उसन्या नेलेल्या तुपाच्या हंडयांची, पाटीलबुवांच्या मित्रमंडळीदेखत त्यानें उघड उघड मागणी केली त्यांच्याकडे.

अशा वेळीं कांय करायचें, तें सारें पाटीलबुवांनीं आधींच ठरवलें होतें !

तेव्हां, थोडया रागानें, पण तरी वर वर शांतपणें ते म्हणाले.... "तुमचं डोकं फिरलेलं तर नाहीं ना, भटजी ?....काय बोलत आहां त्याची शुद्ध नसावी तुम्हाला ! हें कोणी ऐकलं तर हसतील नि शेण घालतील तोंडांत तुमच्या !"

## ८

आणि खरोखरच पाटीलबुवांची मित्रमंडळी हसत होती कृष्णंभटाला त्याचवेळीं....

मग मात्र, कृष्णंभटाला आपला राग आवरेना. तो चिडून पाटलांना म्हणाला–" तुमच्यासारख्या गांवच्या पाटलाला शोभत नाहींत, हे उलट्या काळजाचे धंदे !—बऱ्या बोलानें माझं तूप द्या मला ! ".

" अरे वारे, भटा ! बराच धीट झालास की उद्धटा !" पाटील हातांतील खेळाची पानें फेंकून रागानें उठत म्हणाले–" लाज कशी नाहीं वाटत तुला ?—माझ्या घरांत सात म्हशींचं दुभतं असतांना, मी तुझ्या सारख्या एक म्हैशीवाल्या दरिद्राकडे तूप उसनं मागायला येणार ?.... कोणी शहाणा खरं तरी कसं म्हणेल हें ?....भिकारडा ! गळेपडू शिरजोरी करायला आला चारचौघांत !....आतां बऱ्या बोलानें, चालता हो, इथून जीव घेऊन, आल्या पावलीं...."

कृष्णंभट तर नाहक अपमानाच्या रागानें थरथरूं लागला. पाटलांची कृतघ्न दरोडखोरी त्याला सहनच होईना.

शब्दानें शब्द वाढत गेला; जवळपासचे पुष्कळ लोक जमले.

पण साऱ्यांना कृष्णंभटाचें म्हणणें खरेंच वाटेना.

त्यांनीं सर्वांनी मिळून, शेवटीं त्यालाच त्याच्या घरीं हांकललें.

' आपलं तूप गेलं, आपला चांगुलपणा उकिरडयावर पडला, नि वर आपली चारचौघांच्या देखत बेअब्रू झाली !' या विचारामुळेंच कृष्णंभट चुरशीला पेटला.

त्याला आतां त्याचें तूप नको होतें. खरा न्याय पाहिजे होता.

म्हणूनच कृष्णंभटानें शेजारच्या मोठ्या गांवच्या न्यायाधीशाकडे ती फिर्याद गुदरली. आणि तोच तो आज चालूं असलेला ' रामजी–कृष्णंभट खटला '—

## ९

झालें; कज्जा सुरूं झाला.

त्या चाणाक्ष न्यायाधीशांनीं, दोघांकडेही अगदीं आपादमस्तक पाहिलें. मग निमूटपणेंच दोघांचे चेहरे न्याहाळून, आपला चेहरा गंभीर केला.



न्यायदान पहायला जमलेली मंडळी, अगदीं गुपचूप बसून मोठ्या उत्सुकतेनें तिघांकडे आळीपाळीनें पहात होती.

" कृष्णंभटजी, तुमचा साक्षीदार कोण ?–" न्यायाधीश शेवटीं गंभीर आवाजांत म्हणाले.

" दुसरं कोणीच नाही महाराज !–माझं निष्पाप मन नि रामजी पाटलांचा शब्द, हेच माझे दोन साक्षीदार !–पाटलांचा शब्द फिरला–माझं मन मात्र मला अजून साक्ष देत आहे !–" कृष्णंभट शांतपणें म्हणाला.

' तुमचं काय म्हणणं, रामजी पाटील ?' न्यायाधीश त्यांच्याकडे वळून म्हणाले.

" आपल्याला सारी हकीकत माहीत झालींच आहे आतां, महाराज !" रामजी पाटील नाटकी आदबीनें म्हणाले–" हा भटजी खोटं बोलतोय् साफ, हें आपल्यालाही समजलंच असेल !—"

" रास्त आहे तुमचं एका दृष्टीनें–" न्यायाधीश पाटलांना म्हणाले. " पुन्हा कृष्णंभटांना कोणी साक्षीदार नाही !–नुसता तर्क चालवला तर ते फिर्याद आतांच हरले आहेत. तुम्ही निरपराधी आहांत—"

न्यायाधीशाचे ते उद्गार ऐकून, रामजी पाटील एकदम खूष झाले. आणि कृष्णंभटाकडे तुच्छतेनें पाहूं लागले.

इतक्यांत, न्यायाधीश पुढें म्हणाले—" तर मग आतां साक्षपुरावा नसलेली ही तक्रार ! माझ्यापुढें आलीच आहे. तेव्हां शास्त्राला धरून दुसरा कांहीं मार्ग शोधून, मला न्याय हा दिला पाहिजेच ! पाटील, तुमचा विश्वास आहे ना ?"

पाटलांना वाटलें,–' कसला का मार्ग असेना; आतां न्यायाधिशाचं मत उघड उघड आपल्या बाजूला अनुकूल झालंच आहे !'

ते पटकन् म्हणाले–" हें काय बोलणं, महाराज ?–आपण सुचवाल तें योग्यच होईल...."

## १०

" बरं तर...." न्यायाधीश दोघांकडे पाहून म्हणाले, " भूमी, सूर्य, पाणी यापैकीं कोणा तरी एकाला साक्ष ठेऊन सांगण्याची अशा वेळीं शास्त्र अनुमती देतं ! तेव्हां, ती पहा समोर खाडी आहे. अगदीं गपचूप जा पुढें ! नि तेथल्या पाण्याला मनोभावें स्पर्श करा; खरं बोलूं अशी शपथ घ्या मनांत. नि परत या. सांगाल तें ऐकून मी योग्य तो न्याय देतों. "

समोर लांबपर्यंत खाडी पसरली होती. ओहोटीमुळें पाणी अर्धा फर्लांग आंत गेलें होतें. मध्यें खूपखूप चिखल झाला होता रखरबीत; पाण्याला स्पर्श करायचा म्हणजे चिखल तुडवत जाणें भागच होतें.

न्यायाधीशांनीं तें सांगतांच, कृष्णंभट, विलंब न करतां निमूट, त्या दिशेनें चालूं लागला.

पण तो चिखल पाहून, जरा कांकूं करीत पाटील न्यायाधीशांना म्हणाले, " महाराज, मी पाण्यापर्यंत घोडयावरून गेलों तर ? किंवा माझ्या दोघा गडयांच्या खांद्यावर हात टाकून, पाय कोरडे ठेऊन गेलों तर ? चालेल ना ? मध्यें फार चिखल आहे म्हणून विचारतों !"

" चाललं असतं पाटील !" न्यायाधीश हंसून म्हणाले, " पण, पाणी हा साक्षात् देव ! अशा वेळीं त्याच्या जवळ चालतच जाऊन स्पर्श करायला पाहिजे. ते कृष्णंभट गेले पहा पुढें. "

तेव्हां शेवटीं, अगदीं नाइलाजानें पाटील चिखलातून चालूं लागले.

## ११

पाण्याला स्पर्श करून कृष्णंभट व रामजी पाटील दोघे बरोबरच परत येत होते.



येतां येतां न राहवून कृष्णंभट पाटलांना हळूंच म्हणाला, " पाटील, तूप देऊं नका पाहिजे तर ! पण खरं कबूल करून टाका ! मी तुमच्या वांटेलाही कधीं गेलों नव्हतों. उलट, तुमच्या नडीला तुम्हाला मदत केली ! तरी पुन्हां कां माझी गरीबाचीच बेअब्रू करतां ?"

जवळ कोणी नाहीं ही खात्री असल्यामुळें, पाटील कुत्सितच म्हणाले, " गप्प बस, भटा ! एकदां झालं तें झालं–आतां चार चौघांत कबूल करून माझ्या हातानें माझी अब्रू गमावून बसणार नाहीं मी ! पुन्हां, निवाडा तुझ्याविरुद्ध जाणार, हें दिसतंच आहे !"

न्यायाधीश लांबून दोघांकडे लक्षपूर्वक पहात होते.

सर्व मंडळीही आतां पुढें काय होतें तें पहायला उत्सुक झाली होती.

## १२

रामजी पाटील व कृष्णंभट, दोघे जवळ येतांच न्यायाधीश थोड्या रागानें म्हणाले—" या दिव्यांतून पार पडतांना कोणी कोणाशी बोलायचं नसतं, कृष्णंभट !—तुम्हीच प्रथम बोलूं लागलांत, हो ना ? पाहिलं मी !—कां बरं बोललांत ?"—

" मला राहवेना, महाराज— " कृष्णंभट अजीजीनें म्हणाला.

" हे काय बोलले हो पाटील ?—" न्यायाधीशांनी मुद्दाम पाटलांकडे वळून विचारलें.

पाटलांची आतां मात्र खात्रीच झाली. न्यायाधीश आपलीच सारखी बाजू घेत आहेत. तेव्हां सगळं न सांगतां, पाटील कावेबाजपणें म्हणाले, " महाराज, कृष्णंभट म्हणत होता 'माझी गरीबाची बेअब्रू कांकरतां ?' "–

" हो ना ?—वाटलंच मला, हे भटजी असल्या लटपटी करतील, म्हणून !–" न्यायाधीश क्षणभर थांबून हसत कृष्णंभटाकडे पाहून म्हणाले. " बरं, आतां तुमचे पाय चिखलानें माखले आहेत दोघांचे;

तेव्हां ते आधीं धुवून घ्या. नि पटकन् माझ्यासमोर या. मग न्याय सांगतों मी !—"

## १३

न्यायाधीशाच्या नोकरानें रामजी पाटलांपुढें एक भरलेली कळशी ठेवली व कृष्णंभटाच्या समोर एक राजापुरी तांब्या ठेवला.

असल्या प्रत्येक गोष्टीनें, पाटील खूष होंत होते. 'आतां आपणच कज्जा जिंकणार '–अशी खात्री झाली त्यांची.

पण रस्त्यांत चिखलांत चालायला लागल्याबद्दल मात्र, त्या न्यायाधीशांचा त्यांना राग आला होता ! तसल्या रागारागांतच त्यांनीं कळशीतल्या पाण्यानें आपले पाय धुतले.

कृष्णंभटानें आपल्या समोर ठेवलेल्या तांब्याकडे एकदां पाहिलें.

मग नेहमीच्या संवयीप्रमाणें थोडा विचार केला. चौफेर दृष्टी फिरवली. थोड्या अंतरावर न्यायाधीशांच्या घोड्यासमोर गवत घातलेलें दिसलें त्याला. त्यानें तेथें जाऊन, थोडया गवतानें प्रथम पायाचा चिखल साफ पुसला. मग तांब्यांतल्या थोडथोडया पाण्यानें हळूहळू दोन्ही पाय धुवून व न्यायाधीशासमोर जाऊन, तो निमूट उभा राहिला.

रामजी पाटीलही तोंपर्यंत त्यांच्याजवळ येऊन उभे राहिले होते.

इतक्यांत न्यायाधीश म्हणाले–'कृष्णंभट, पाटील, ठरला माझा न्याय ! कोणाला आतां कांहीं बोलायला नको !—कसला जाब द्यायला नको !—लबाड कोण तें सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट दिसत आहे मला !—"

## १४

रामजी पाटील जिंकणार या खात्रीनें जमलेली मंडळी न्यायाधीशाकडे पाहूं लागली.

कृष्णंभट तरीही शांतपणें उभा होता.



पण पाटीलांनीं फाजील खात्रीनें न्यायाधीशांना पटकन् विचारलें– "कोणाला लबाड ठरवलंत, महाराज ?—"

न्यायाधीश जरा रागानें व कठोरपणें उलटून उत्तरले, "तुम्हींच बरं, रामजी पाटील ! तुम्हींच !"

पाटलांसकट सारे एकदम दचकले; कृष्णंभट गप्प उभा होता.

"तुम्हाला महिनाभर कैदेची शिक्षा मिळेल आतां ! तुमची पाटिलकी काढून घेण्यांत येईल. आणि कृष्णंभटांना तुम्ही तुपाचे दोन हंडे परत करून आणखी तिसरा एक त्यांना झालेल्या त्रासाबद्दल दंड म्हणून द्यायचा ! समजला माझा न्याय !" न्यायाधीशांनीं आपला निवाडा पुरा केला.

"क....का....काय ?" पाटीलबुवांची बोबडी वळून, ते म्हणाले. "असा कसा न्याय ठरेल ?"

"गप्प रहा ! त्या खाडीतल्या जलदेवतेनेंच न्याय दिला हा !" न्यायाधीश तिरस्कारयुक्त स्मित करून म्हणाले.

सर्वजण टकमका न्यायाधीशांकडे नि रामजी पाटलांकडे पहात राहिले.

## १५

"महाराज !" इतका वेळ कांहीं न बोलतां सारें करीत असलेला कृष्णंभट, आदबीनें हात जोडून, न्यायाधीशांना एकदम म्हणाला, "पाटील जरा घमेंडीत गेले; त्यामुळेंच सारी लबाडी घडली त्यांच्या हातून ! तरी पण, आपण इतकी जबर शिक्षा देऊं नये त्यांना. दया करावी त्यांच्यावर ! मलाच एवढी भीक घालावी !"

तें ऐकून न्यायाधीश पुन्हा हसले व मग पाटलांना म्हणाले, "घ्या, घ्या. पाटील ! शेजारधर्म, न्यायीपणा, विनम्रपणा नि दयाशीलपणा हे गुण कृष्णंभटांकडून घ्या—आतां त्यांची क्षमा मागून प्रथम अपराध कबूल करा. मग ते सांगतील तोच न्याय मी कायम करतों !—"

तेव्हां ते आधीं धुवून घ्या. नि पटकन् माझ्यासमोर या. मग न्याय सांगतों मी !—"

## १३

न्यायाधीशाच्या नोकरानें रामजी पाटलांपुढे एक भरलेली कळशी ठेवली व कृष्णंभटाच्या समोर एक राजापुरी तांब्या ठेवला.

असल्या प्रत्येक गोष्टीनें, पाटील खूष होत होते. ' आतां आपणच कज्जा जिंकणार '—अशी खात्री झाली त्यांची.

पण रबरबीत चिखलांत चालायला लागल्याबद्दल मात्र, त्या न्यायाधीशांचा त्यांना राग आला होता! तसल्या रागारागांतच त्यांनीं कळशीतल्या पाण्यानें आपले पाय धुतले.

कृष्णंभटानें आपल्या समोर ठेवलेल्या तांब्याकडे एकदां पाहिलें.

मग नेहमीच्या संवयीप्रमाणें थोडा विचार केला. चौफेर दृष्टी फिरवली. थोड्या अंतरावर न्यायाधीशांच्या घोड्यासमोर गवत घातलेलें दिसलें त्याला. त्यानें तेथें जाऊन, थोडया गवतानें प्रथम पायाचा चिखल साफ पुसला. मग तांब्यांतल्या थोडथोडया पाण्यानें हळूहळू दोन्ही पाय धुवून व न्यायाधीशासमोर जाऊन, तो निमूट उभा राहिला.

रामजी पाटीलही तोंपर्यंत त्यांच्याजवळ येऊन उभे राहिले होते.

इतक्यांत न्यायाधीश म्हणाले–' कृष्णंभट, पाटील, ठरला माझा न्याय ! कोणाला आतां कांहीं बोलायला नको !—कसला जाब द्यायला नको !—लबाड कोण तें सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट दिसत आहे मला !—"

## १४

रामजी पाटील जिंकणार या खात्रीनें जमलेली मंडळी न्यायाधीशा-कडे पाहूं लागली.

कृष्णंभट तरीही शांतपणें उभा होता.



पण पाटीलांनीं फाजील खात्रीनें न्यायाधीशांना पटकन् विचारलें– " कोणाला लबाड ठरवलंत, महाराज ?—"

न्यायाधीश जरा रागानें व कठोरपणें उलटून उत्तरले, " तुम्हीच बरं, रामजी पाटील ! तुम्हीच !"

पाटलांसकट सारे एकदम दचकले; कृष्णंभट गप्प उभा होता.

" तुम्हाला महिनाभर कैदेची शिक्षा मिळेल आतां! तुमची पाटिलकी काढून घेण्यांत येईल. आणि कृष्णंभटांना तुम्ही तुपाचे दोन हंडे परत करून आणखी तिसरा एक त्यांना झालेल्या त्रासाबद्दल दंड म्हणून द्यायचा! समजला माझा न्याय!" न्यायाधीशांनीं आपला निवाडा पुरा केला.

" क....का....काय ?" पाटीलबुवांची बोबडी वळून, ते म्हणाले. "असा कसा न्याय ठरेल ?"

" गप्प रहा ! त्या खाडीतल्या जलदेवतेनेंच न्याय दिला हा !" न्यायाधीश तिरस्कारयुक्त स्मित करून म्हणाले.

सर्वजण टकमका न्यायाधीशांकडे नि रामजी पाटलांकडे पहात राहिले.

## १५

" महाराज !" इतका वेळ कांहीं न बोलतां सारें करीत असलेला कृष्णंभट, आदबीनें हात जोडून, न्यायाधीशांना एकदम म्हणाला, " पाटील जरा घमेंडीत गेले; त्यामुळेंच सारी लबाडी घडली त्यांच्या हातून ! तरी पण, आपण इतकी जबर शिक्षा देऊं नये त्यांना. दया करावी त्यांच्यावर ! मलाच एवढी भीक घालावी !"

तें ऐकून न्यायाधीश पुन्हा हसले व मग पाटलांना म्हणाले, " घ्या, घ्या. पाटील! शेजारधर्म, न्यायीपणा, विनम्रपणा नि दयाशीलपणा हे गुण कृष्णंभटांकडून घ्या—आतां त्यांची क्षमा मागून प्रथम अपराध कबूल करा. मग ते सांगतील तोच न्याय मी कायम करतों !—"

दुसऱ्याही कोणाला, साक्षीपुराव्याशिवाय केवळ शब्दावर विश्वास ठेवून कांहींहि देईल ! उलट, पाटलांसारख्या घमेंडानंदन, ऐद्री, लबाड माणसाला सात म्हशी घरांत असून सुद्धां, तुपाची जरूर पडेल, नि शेवटीं, तो असली खोटी फिर्यादही मांडेल !”

न्यायाधिशाच्या त्या साऱ्या तर्कचातुर्याचें कौतुक करीत जमलेलीं सारीं माणसें आपापल्या घरीं परतलीं.

★


– अमर ज्योति वाङ्मय –

गीत-ज्योती

[ बाल-बालिकांचा अभिनव सचित्र काव्य-संग्रह ]

‘ प्रफुल्लचंद्र ’

[ उद्बोधक चरित्र-वाङ्मय ]

– कथा-वाङ्मय –

१ नशीबाची परीक्षा. ३ मडक्यांतला न्याय.
२ आजिंक्य पंडित. ४ सत्यकथा.

जरूर जरूर वाचा !


# २-जमिनीतले गोटे

व

## जमिनीवरचा चारा

श्रीपती मोठा कष्टाळू शेतकरी होता. त्याच्या शेतांत तो धान्य पिकवी; पण त्याला व त्याच्या बायकापोरांना वर्षभर तेवढें पुरें पडत नसे.

त्याच्या शेताशेजारींच एक मोठा ओसाड माळरानाचा तुकडा पसरला होता. त्याच्याकडे कित्येक वर्षे कोणी ढुंकूनही पाहिलें नव्हतें. तेव्हां एके दिवशीं श्रीपतीनें स्वतःशीच विचार केला; या जमिनीचा उपयोग करावा; त्यानें त्याला बांध घातला; नांगर धरला, व तो तें शेत लावण्याच्या कामाला लागला. कित्येक दिवस उन्हातान्हांत खपून त्यानें तें ओसाड शेत सारें चांगलें नांगरलें.

तो आतां त्यांत कांहीं पेरणार, तोंच, अगदीं पावसाच्या तोंडावर, त्या शेताचे मालक शेटजी त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे राहिले. आणि आपली मालकी गाजवीत, त्यांनीं श्रीपतीला एकदम शिवीगाळ सुरू केली.

श्रीपती शेठजींना शांतपणें म्हणाला—“ महाराज, ही जमीन आपली असेल; तशीच ती देवाचीही आहे ! आपण जमिनीकडे आजपर्यंत दुर्लक्ष केलें; म्हणून देवानेंच मला तिची मशागत करायची बुद्धी दिली.”

“ देव बीव मी कांहीं जाणत नाहीं ! ” शेटजी कुर्‍यांत म्हणाले. “ माझ्या जमिनींत माझ्या परवानगीशिवाय तूं असा धुमाकूळ माजवलास तर तुला तुरुंगात पाठवीत मी !—सांगून ठेवतों ! ”

## २

श्रीपतीनें पाहिलें—"कायदा तर शेटजींच्या बाजूचा आहे. आपण केलेली सारी मेहनत जाईल फुकट !....त्यापेक्षां आपण त्यांच्याशीं मिळतं घ्यावं."

तेव्हां तो आदबीनें शेटजींना म्हणाला—"इतक्या थराला कशाला जातां, मालक ?– शेतांत जें पिकेल त्याचा निम्मा भाग तुम्ही घ्या....निम्मा मला द्या....मीच सारे श्रम, खतपाणी करणार !— मग झालं कीं नाहीं ?"

पण शेटजी होते पक्के स्वार्थी;....श्रीपतीवर ओरडून त्याला दमांत घेत ते म्हणाले, "तें कांहीं नाहीं. पहिलीं कांहीं वर्षे तूं जें पीक काढशील, तें सारंच्या सारं तूं मलाच दिलं पाहिजेस !"

मालक शेटजींचा तो स्वार्थीपणा पाहून श्रीपतीला मनांत खूप राग आला. त्यांच्याबरोबर जशास तसेंच वागायचें ठरवून टाकलें त्यानें. आणि तो शेटजींना कावेबाजपणें म्हणाला, "तसं का होईना, मालक ! आतां एवढंच मला सांगा....शेतांत जें पिकेल त्यांतलं तुम्हाला जमिनीवरचं द्यायचं का जमिनीच्या पोटांतलं ?"

शेटजींना शेतीची कुठे काय माहिती होती ? त्या प्रश्नानें गोंधळून जाऊन त्यांनीं म्हटलें, "जमिनीच्या पोटांत रे काय मिळणार ? दगड-धोंडे ? ते घे तुलाच !!"

श्रीपती हळूंच हसला व म्हणाला, "बरं मालक, तुम्ही या वर्षी जमिनीवर पिकेल तें घ्या. मी आपले जमिनीच्या पोटातले खडे माझ्या-पोटांत भरेन !"

शेटजी आपली मालकी गाजवून, मोठ्या समाधानानें घरीं निघून गेले.



## ३

त्या वर्षी, श्रीपतीनें बटाटा, कांदा, भुईमूग वगैरेचें बी शेतांत पेरलें. शेटजींकडे शेवटीं सुकलेल्या रोपट्यांचे भारेच्या भारे नेऊन टाकतांना तो म्हणाला—"घ्या, मालक !–हा कराराप्रमाणें आपला हिस्सा !"

शेटजी चिडले. मोठमोठ्यानें ओरडूं लागले. म्हणाले, "हा काय बदमाशपणा चालवला आहेस ?"

श्रीपती शांतपणें म्हणाला—"मालक, माझं काय चुकलं—ठरल्याप्रमाणें जमिनीवर पिकलेलं सारंच्या सारं आपल्याकडे आणून टाकलं—एक काडी देखील मी माझ्या घरांत ठेवली नाही ! सांगितलंत, तसे जमिनीत पिकलेले खडे तेवढे मी पोटांत घातले !—"

शेटजींचा नाइलाज झाला. ते रागांतच म्हणाले "बरं बरं ! आतां पुढल्या वर्षी—"

"हो, तें राहिलंच ! काय करूं सरकार ?" श्रीपती अदबीनें त्यांना म्हणाला.

"पुढल्या वर्षी जमिनीच्या पोटांत जें पिकेल तें सारंच्या सारं माझ्याकडे आणून घाल !" शेटजी ऐटींत म्हणाले.

"सारंच्या सारं ?" श्रीपती अचंब्यानें म्हणाला. "मालक, विचार करा जरा ! सारं आपल्याला देऊन मग मी काय खाऊं ?"

"तूं खा हा असला जमिनीवरचा चारा–पाचोळा !" शेटजी निष्ठुर अंतःकरणानें म्हणाले. "मला जमिनींतलं सारंच्या सारं मिळालं पाहिजे ! नाहीं तर पडूं द्या माझी जमीन ओसाड !"

श्रीपतीनें मनांत पुन्हां निराळीच खूणगांठ बांधली, नि तो जातांना म्हणाला, "बरं धनी, पुढल्या वर्षाला मी जमिनीच्या पोटांत पिकेल, तें सारंच्या सारं आपल्याकडे लावून देईन ! मी त्यांतलं कांहीं ठेवणार नाहीं स्वतःसाठीं ! झालं ? ठरला करार !"

तो कबुलीजबाब ऐकून शेठजी पुन्हा खूप झाले !

४

श्रीपतीनें त्या वर्षी, त्या शेतांत, बाजरी-गहूं-हरभरा लावला; वांगी, भेंडे, टोमॅटो, माठ वगैरे भाजीपाला केला.

वर्षाशेवटीं शेटजींच्या अंगणांत पुन्हां सुकलेल्या रोपटांच्या मुळांपासच्या ढेंकळांची रास श्रीपतीनें मारली.

तें पाहून, शेटजी पुन्हां भयंकर चिडले. ते मोठ्यानें ओरडून रागानें थरथर कांपत म्हणाले, " अरे....अरे....शिरप्या, हें काय, गधड्या ?"

" मालक, उगीच शिवीगाळ नका करूं ! हा आपला ठरलेला करार !" श्रीपती शांतपणें म्हणाला, " या वर्षी जमिनीच्या पोटांतलं कांहींसुद्धां मी माझ्यासाठीं ठेवलं नाही. जमिनीवर पिकलेला चारा पाला तेवढाच माझ्या घरांतल्या बेगमीसाठीं मी वापरला ! बाकी साऱ्या सारं हें तुमच्यासमोर आहे ! देवाची शपथ !"

सारं लक्षांत येऊन शेटजी खूप वरमले. ' श्रीपती चाणाक्ष नि हुशार आहे. कष्टाळू आहे' हें त्यांना आतां पक्कें समजलें. ' तो पिकवेल त्यावरच आपला फायदा आहे. आपला फायदा-तोटा करणं त्याच्याच हातीं आहे नि पुन्हा साराच फायदा आपण अपेक्षिणें बरोबर नाही. ' याची त्यांना पूर्ण जाणीव झाली.

५

श्रीपती जायला उठतां उठतां, शेटजींना म्हणाला-" मालक, आतां पुढल्या वर्षाच्या पिकाची व्यवस्था काय करायची ? सांगा ! आधीं ठरलेलं बरं !-"

शेटजी श्रीपतीच्या त्या खोंचक प्रश्नानें नरमले; त्यांनीं पुन्हां लाजेनें खालीं मान घातली; हळूंच श्रीपतीला ते म्हणाले—" श्रीपती, चुकलं



माझं !—मी कसला मालक जमिनीचा ?....तूंच तिला पाहिजे तें करायला लावतोस !....या वर्षापासून माझ्या कांहीं अटी नाहींत ! तुला मला जेवढं द्यावेसं वाटेल तेवढं दे. त्यांतच मी संतुष्ट आहे ! "

श्रीपती आनंदून कृतज्ञतेनें म्हणाला—" मालक, आतां कसं लाख बोललांत ! पिकेल त्यातलं योग्य तितकं तुम्हाला देईल !-या दोन वर्षांचंही तुमचं निम्मं पीक मी निराळे कणगे भरून ठेवलं आहेत. "

" अहंहं !-नाहीं, श्रीपती !"—शेटजी पश्चात्तापानें म्हणाले, " तें मात्र आतां तूं देऊनही मी घेणार नाहीं !-माझ्या दुष्ट स्वभावाचें प्रायश्चित्त मला चांगलंच मिळालं !—आणि तुझ्या चातुर्याचं व कष्टाचं तुला तें फळ मिळालं !...."

★

# ३-प्रेमाची किंमत-

१

त्यावेळीं करमणूक म्हणून मोठ्या वर्तुळांत हिंस्र पशूंच्या क्रूर झुंजी लावल्या जात. नि तासन् तास त्या पहात, राजासकट सारे सरदार व प्रजाजन आपल्या जिवाची करमणूक करीत.

एके दिवशीं, फ्रान्सिस राजा असाच खेळ पहाण्यास बसला होता. त्याच्या भोंवती त्याच्या दरबारांतील अनेक सरदार दरकदार घराण्यांतील तरुण-वृद्ध स्त्री-पुरुष बसले होते. सामान्यजनही बसले होते.

आंतल्या वर्तुळांत मस्त पशूंच्या झुंजीस सुरवात होणार होती. सगळीकडे गडबड-गजबज चालली होती.

# २

इतक्यांत, राजानें आपल्या सेवकांना खूण केली. सारी एकदम शांतता झाली चोहूंकडे.

राजाची मान हलली. वर्तुळाच्या एका दारांतून एक भयानक सिंह डुलत डुलत आंत आला.

त्यानें एकदां इकडे तिकडे गंभीरपणें, पाहिलें व शेंपटी चाळवून—आपटून तो वर्तुळाच्या मध्यावर जाऊन बसला.

राजाची मान पुन्हा एकदां हलली! तत्काळ दुसरा दरवाजा उघडला गेला.

त्यांतून एक मस्त वाघ बाहेर पडला. सिंहाला समोर पहातांच, त्यानें एक भयानक डरकाळी फोडली. थोडा वेळ गुरगुरत भोंवतीं पाहून, सिंहापासून थोड्याच अंतरावर तोही जमिनीवर स्वस्थ बसला.

राजाची मान तिसऱ्यांदा हलली. लागलींच तिसरा एक दरवाजा उघडला गेला.

आंतून दोन तुंदिलतनु बिबळे वाघ उड्या मारत वर्तुळांत शिरले.

वाघाला समोर पहातांच, दोघेही बिबळे त्याच्यावर उडी टाकून गेले. पण वाघानें आपल्या पंजांनीं त्यांना अगदीं लीलेनें बाजूला सारलें.

त्यावेळीं त्या तिन्ही प्राण्यांनीं फोडलेल्या गगनभेदी डरकाळ्यांनीं साऱ्या प्रेक्षकांच्या कानठळ्या बसल्या. कित्येकांच्या अंगावर भीतीनें रोमांच उभे राहिले. कांहीं बायकामुलें अर्धवट बेशुद्ध पडलीं!

# ३

ते अक्राळ विक्राळ चार प्राणी, निरनिराळ्या ठिकाणीं तसे टपून बसल्यामुळें, भोंवतीं अगदीं भयानक शांतता पसरली होती. श्वास कोंडून 'पुढें काय होतं,' या उत्सुकतेनें वर्तुळाकडे पहात होते सारेजण!—



तेवढ्यांतच वाघ व सिंह बसले होते त्यांच्या दरम्यान, त्या वर्तुळांत एक गोंडस हातमोजा हवेंतून उडत जाऊन पडला.

राजासकट सगळे दचकून भोंवतीं पाहूं लागले.

सरदारांच्या जागेकडूनच तो हातमोजा उडाला होता; नि तेथें एक सरदाराची सौंदर्यखानी मुलगी उभी होती.

आपल्या शेजारच्या तरुण सरदाराला ती सहास्य म्हणत होती—"नेहमीं तुम्ही मला म्हणतां ना, कीं, तुमचं माझ्यावर फार फार प्रेम आहे? त्यासाठीं तुम्ही वाटेल तें कराल?....मग जा तर!....तो माझा हातमोजा आत्तांच्या आतां आणून द्या मला परत!"

# ४

त्या देखण्या रुबाबदार तरुण सरदारानें तिच्याकडे एकदां निरखून पाहिलें. क्षणभर त्या मृत्यूच्या वर्तुळाकार जबड्याकडे दृष्टि टाकली.

आणि मग....काय होतं आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत येण्यापूर्वीच त्यानें ताडकन् त्या भयप्रद हिंस्र पशूंच्या वर्तुळांत उडी मारली.

वाघ-सिंह पटकन् जागचे उठले. त्यांनीं मोठ्यानें डरकाळ्या फोडल्या व प्रत्येकानें ताडताड त्याच्या बाजूस टिपटी झोंकल्या.

पण त्यापूर्वींच, तो तरुण सरदार त्या वर्तुळाबाहेर उडी मारून आलाही होता.

अगदीं विद्युत्‌गतीनें तो धांवत गेला होता नि तो हात-मोजा उचलून, तो अगदीं वायुवेगानेंच परत फिरला होता.

सर्वांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. त्या तरुणाचा गौरव झाला.

त्याची स्तुती करायला सारे त्याच्या भोंवती गोळा झाले. त्यांना वाटलें, 'आतां एवढं मोठं धाडस करून त्यानें तो हातमोजा परत आणल्यावर दुसरं आणखी राहिलं काय?

'त्या लावण्यलतिकेपुढें त्यानें तो धरला, कीं, ती त्याचा नि त्या तरुणाचाही हंसतमुखानें स्वीकार करील! त्या प्रेमीयुगलाचें आतां सुखद लग्न साजरं होईल?'—असेंच वाटत होतें जमलेल्या साऱ्यांना!—

५

पण तो उमदा तरुण सरदार त्या सुंदर सरदारकन्येच्या पुढें क्षणभर धांपा टाकीत उभा राहिला; त्यानें तिच्याकडे एकदां निरखून पाहिलें; नि मग तो तिला म्हणाला-" केवळ स्वतःच्या मौजेखातर माझा जीव तूं एवढ्या भयंकर धोक्यांत घालायला सहजासहजीं तयार झालीस अं! ठीक तर! माझं तुझ्यावर केवढं प्रेम होतं याची कल्पना आलीच असेल तुला, आतां!—पण मला मात्र तुझ्या प्रेमाची या पुढें काडीइतकीही किंमत नाहीं. त्या तसल्या प्रेमाशिवायही मी सुखानें जगूं शकेन!"

आणि एवढें म्हणून, तेवढ्या धोक्यांतून परत आणून आपल्या हातांत इतका वेळ धरलेला तिचा तो हातमोजा त्यानें रागानें व तुच्छतेनें खाडकन् तिच्या तोंडावर फेंकला...

पुढें अगदीं कांहीं एक न बोलतां, तो तिच्या समोरून निघाला; आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे टकमका पहात असलेल्या सभोंवारच्या गर्दींत मिसळून तो हां हां म्हणतां दिसेनासा देखील झाला!!

माणसाच्या मनाच्या हालचाली मोठ्या गहन असतात.

★

# ४-चोराची चोरी-

१

एका शेटजींचा एक इमानी नोकर मोहरांनीं भरलेली पिशवी घेऊन एका गांवाहून दुसऱ्या गांवीं तांतडीनें चालला होता.

रस्त्यांत दाट जंगल होतें. अजून दोन मैल पल्ला गांठावयाचा होता. तेवढ्यांतच दाट काळोख पडला.

तो मनांत थोडा घाबरला होता. कारण त्याच्याकडे हत्यार वगैरे कांहीं नव्हतें; व त्या रस्त्याला त्या दिवसांत चोरांचा सुळसुळाट असे.



तो असा विचार करीत झपाझप पावलें टाकून रस्ता कांटत आहे, तोंच अगदीं जवळून बंदुकीचा आवाज आल्यामुळें तो दचकला.

तेवढ्यांत एक चोर बंदुक हातांत घेऊन त्याच्या रस्त्यांत समोरच उभा राहिला व म्हणाला—"जिवंत जायचं असेल पुढें, तर असेल नसेल तें माझ्याकडे दे!"

२

नोकरानें प्रसंग ओळखला व. मोहरांची पिशवी चोराच्या हातीं दिली निमूटपणें.

पण ती दिल्यावर तो म्हणाला, "राव, धन्यांच्या एवढ्या मोहरा आपल्या हातीं तर जात आहेतच. पण पुन्हां मीच उलट आणखी चोर ठरेन, तेथें गेल्यावर—तेव्हां माझ्यासाठीं तरी एक गोष्ट करा....तेवढी भीक घालाच मला!"

मोहरांची पिशवी ऐटींत छातीजवळ धरत चोर म्हणाला—"या काळोखांत तुझ्यासाठीं मला काय करतां येणार मला समजत नाहीं!—"

"का बरं?—सहज करतां येईल!" नोकर विनम्रपणें म्हणाला— "शेटजींची मोहराची पिशवी गेली. पण मी धडपड न करतांच ती गेली, असं पाहून शेटजी मला चोराचा साथीदार म्हणतील—माझ्यावर रागावतील नि मग माझी गरिबाची नोकरीही जाईल!—"

३

"मग मी काय करूं त्याला म्हणतोस?" जरा गोंधळून चोर म्हणाला.

"तुमच्याबरोबर मी थोडीफार झटापट केली असं तर शेटजींना दिसलं पाहिजे?" तो नोकर अगदीं साधेपणें म्हणाला-" ही मी माझी कांबळी पुढें करतों! आपण आणखी एकदोन गोळ्या मारा....मला सांगतां तरी येईल, तसं—"

चोरानें त्याच्यावर उपकार म्हणून त्याच्या कांबळीसमोर लागोपाठ बंदुकीचे दोन बार काढले. आणि मग तो म्हणाला, "झालं ?—जा आतां–"

नोकर जायला म्हणून निघाला. पण त्यानें हळूच आपली कांबळी हातानें चाचपून पाहिली; तिच्यांत एकही भोंक पडलेलें नव्हते!

४

मागें वळून तो धिम्मेपणें चालूं लागलेल्या जवळच्या चोराला म्हणाला, "काय राव, असली कसली बंदूक तुमची? कांबळींत तर एकही भोंक पडलं नाहीं गोळीनें?"

चोर मोठ्यानें हंसून म्हणाला, "दादा! अरे तेंच तर माझं गुपित आहे! आतां हरकत नाहीं सांगायला तुला....अरे आहेत कुणा लेकाच्या बंदुकींत गोळ्या! वाटसरूंना घाबरवायला दारूचे बार तेवढे काढतों बंदुकींतून...."

"खरं कीं काय?" असें म्हणून ताडकन् उडी मारून त्या नोकरानें चोराच्या छाताडावर बसकण घेतली. त्याला चांगलें कुदकलें व मग मोहरांची पिशवी व त्याचें तें फसवें पिस्तुल देखील काढून घेतलें!

आणि त्या चोराला विव्हळत तसेंच टाकून तो गांवाकडे भरधांव पळत सुटला.

★

# ५-उपकाराची फेड-

१

आपल्या गाडींत धान्याचीं पोतीं भरून एक म्हातारा शेतकरी शहराकडे चालला होता. रस्ता खडकाळ नि खड्यांनीं भरलेला होता. बैलही आपले यथातथाच होते.



मोठ्या प्रयासानें, बैलांच्या व त्याच्या धडपडीनें, त्यानें अर्धा अधिक रस्ता कांटला व सरळ रस्त्याच्या अगदीं तोंडाशीं तो येऊन पोहोंचला.

बैलवाट मोठया रस्त्याला मिळत होती तिथें एक मोठा खड्डा होता; व रस्ता उंच असल्यामुळें तेथें त्याला चढण चढवून गाडी वर न्यावयाची होती.

तो प्रयत्न करतांना रोडक्या बैलांना व त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याला गाडी काबूंत ठेवतां येईना.

शेवटीं, ती मागें मागें घसरत त्या खड्डयांत जाऊन बसली व आंतल्या गोणींपैकीं दोन त्या मोठ्या धक्क्यानें खालीं उडाल्या.

२

म्हाताऱ्यानें गाडी वर ढकलण्याचा प्रयत्न केला. पडलेल्या दोन्ही गोणी गाडींत टाकण्याचा आटोकाट यत्न केला. पण कांहीं जमेना.

शेवटीं, निराश होऊन तो रस्त्यावर जाऊन बसला.

लोक रस्त्यानें जात येत होते. प्रथम एक दोघांना त्यानें मदतीला बोलवलें. पण जो तो आपल्याच गडबडींत! त्याला कोण मदत करतो?.... त्या अनुभवानें तो कपाळावर हात घेऊन स्वस्थ बसला.

तेवढ्यांत, समोरून एका पांढऱ्या शुभ्र उमद्या घोड्यावर बसलेला एक राजबिंडा पुरुष येत असतांना त्याला दिसला. त्याला पाहून तर शेतकऱ्यानें हळूच मान खालीं घातली.

'रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांची मदत मिळाली नाहीं! तर या सरदार आसामीची मदत कसली मिळते आपल्याला? आणि आपण मागणार तरी कशी मदत त्याच्याकडे?'—खालीं मान घालून म्हातारा विचार करीत होता.

३

" काय झालंय काय, आजोबा ? "–एकदम खणखणीत आवाज जवळून ऐकूं आल्यामुळें शेतकऱ्यानें दचकून वर पाहिलें. तोच तो राजबिंडा मनुष्य आपल्या रुबाबदार पांढऱ्या घोड्यावरून शेतकऱ्याजवळ खालीं उतरत होता.

"गाडी खड्ड्यांत आडलीय ! " शेतकरी लाजेनें खालीं पहात संकोची स्वरांत म्हणाला, " नि दोन पोतीं बीं खालीं उडालीयात्...."

त्या पुरुषानें आपला अंगरखा घोड्यावर काढून ठेवला व तो गाडी–रस्त्यावर उतरला.

" चला या, आजोबा ! " तो गाडीच्या चाकाला हात घालीत शेतकऱ्याला म्हणाला, " मी करतों मदत तुम्हांला !"

दचकून जागचे उठत शेतकरी घाबऱ्या स्वरांत म्हणाला, " ह्यें ह्यें काय, धनी ! आपलं काम न्हवं तें !"

" काम सगळ्या माणसांचंच आहे ! चला तुम्ही !" तो चाकाला नेट लावून म्हणाला.

४

शेतकऱ्यानें धांवतच जाऊन दुसऱ्या चाकाला नेट लावला व बैलांना चुचकारलें.

मिनिटभराच्या प्रयत्नानें बैलांनीं गाडी वर ओढली; मग दोन्ही पोतीं दोघांनीं मिळून उचलून गाडींत चढवलीं.

शेवटीं अंगरखा अंगावर चढवून त्या राजबिंड्या माणसानें आपल्या घोड्यावर टांग टाकली.

५

शेतकरी म्हाताऱ्याच्या डोळ्यांत कृतज्ञता पुरेपूर भरली होती.



घोड्याच्या एक दोन टांपा ऐकूं येतांच, तो भानावर येऊन त्या घोडेस्वाराला म्हणाला,–" धनी ! आपल्याला फार तसदी झाली. माझ्यावर लय् उपकार झाले आपले !–कसे फेडूं मी ते ? "

चालतां चालतां घोडा खेंचून तो घोड्यावरचा पुरुष गंभीर हंसून म्हणाला–" फारच सोपं आहे तें !–ज्या ज्या वेळीं कोणी असा प्रसंगांत सांपडलेला दिसेल, त्या त्या वेळीं तुम्ही त्याला मदत केलीत, कीं, माझे उपकार आपोआप फिटतील !–"

एवढें म्हणून त्यानें घोड्याला टांच मारली.

★

# ६–फक्त परिस्थितीचा प्रश्न–

१

डिओमेडिस नांवाचा समुद्रांत चांचेगिरी करणारा शूर नावाडी होता. त्यानें एका गलबताच्या मालकीवर खूप जहाजांची लुटालूट केली होती. कित्येक जहाजें जाळलीं होतीं.

शेवटीं त्याला पकडून राजदूतांनीं इतिहासांत गाजलेला राजा ॲलेक्झँडर याच्यापुढें उभें केलें.

त्याच्यासारख्या यःकश्चित् माणसानें, समुद्रावर फिरणाऱ्या सर्व माणसांना सळो की पळो केलेलें पाहून ॲलेक्झँडर राजा रागानें त्याला म्हणाला–" हें कसलं धाडस आरंभलं आहेस तूं ? तुला कांहीं भय-भीती लाज–लज्जा आहे कीं नाहीं ? "

२

तो चांचा कैदी शूर होता. तसाच चाणाक्षहि होता–

पूर्वी इतक्याच आदबीनेंच ॲलेक्झँडर राजाला तो म्हणाला—" राजे, आपण मला हा प्रश्न विचारण्यापेक्षां स्वतः आपल्याच

कोणी तरी विचारायला पाहिजे ! निदान आपण स्वतःच तो प्रश्न आपल्याला विचारलात तर बरं होईल. मला वाटतं !–"

राजानें त्या शब्दांनीं त्याला रागांत चमकून विचारलें–" काय म्हणालास ?"

" हो महाराज !" तरी तो धीटपणेंच पुढें म्हणाला, " माझ्याकडे तर एकच गलबत आहे. माझ्याकडून जगाला उपद्रव होत असला तर तो किती ?–अगदीं एवढासा....मर्यादित !....पण आपल्याकडे मोठ-मोठ्या जहाजांचे तांडेच्या तांडे आहेत. पदरीं एवढी हजारानीं माणसें आहेत. नि आपणहि समुद्रावर मनमानेल तसा संचार करत फिरतां आहां. लोकांना जिंकता आहां !....पण मी लहान म्हणून मला चोर ठरवून आपल्या सिंहासनासमोर मला तुम्ही कैद करून आणलें. आणि आपल्याला लोक जगज्जेते, पराक्रमी म्हणतात. नशिबाचं वारं जरा जरी फिरलं तरी आपली ठिकाणें उलट सुलट होतील !

राजाला त्याचा तो धीटपणा व तो युक्तिवाद इतका आवडला, कीं, त्यानें डिओमेडिसला आपल्या पदरीं मोठा दर्यासारंग म्हणून ठेऊन घेतलें व त्याच्या स्वैर क्रूर चांचेगिरीऐवजी त्याची आपल्या मोहिमांकडे मदत घेतली.

★

# ७–चाणाक्षपणा–

१

ॲलेक्झँडर राजाचा बाप फिलिप याला त्याच्या प्रधानानें एकदां सांगितलें कीं, दरबारचा एक सरदार त्याच्या विरुद्ध कट करीत आहे. तेव्हां राजानें विचारलें, " त्यावर उपाय काय ?"

प्रधानानें सांगितलें, " त्याला तुरुंगांत टाकावें !"



पण प्रधानानें पुन्हां पुन्हां सांगूनही फिलिफ राजानें त्या गोष्टीला मान्यता दिली नाहीं. तो म्हणाला, " माझ्या शरिराचा एखादा भाग रोगट झाला तर मी तो काय कापून टाकावा ? त्यापेक्षां त्याच्यावर औषधोपचार करणेंच योग्य नाहीं का ?"

२

तेव्हां फिलिफ राजानें त्या कट करणाऱ्या सरदाराला बोलावून आणलें. त्याचा अधिक मान केला. त्याला देणग्या दिल्या; आणि त्याला अधिक जबाबदारीचें काम दिलें. त्याच्यावर नजरही ठेवली.

त्याचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, त्या सरदाराच्या मनांतील असंतुष्टता कमी झाली. राजा विरुद्ध कट करून मोठे होण्याची त्याला आतां जरूर नव्हती. त्यामुळें उलट तो फिलिफ राजाच्या दरबारांतला अतिशय महत्वाचा व स्वामिनिष्ठ सरदार बनला.

★

# ८–त्यागानें दया–

१

ओरेसेस व फिलाडेस नांवाचे दोघे मित्र होते. ते अगदीं जुळ्या भावांप्रमाणें दिसत व त्यांचें भावापेक्षांहि एकमेकांवर अधिक प्रेम होतें.

एका जुलमी सरदारानें एकदा ऑरेसेसला पकडलें, आपल्या खासगी द्वेषामुळें तो त्याला ठार मारणार होता. सेवक त्याला सुळी द्यायला घेऊन जात होते.

फिलाडेसला त्यामुळे फार वाईट वाटलें. त्यानें स्वतःचा जीव धोक्यांत घालून आपल्या मित्राला बचावण्याचें ठरविलें. तो धांवत धांवत

त्या सेवकांबरोबरच त्या जुलमी सरदारापुढें गेला व मित्राचा जीव वांचवण्यासाठीं सांगू लागला-" तो ऑरेसेस नव्हे--मी ऑरेसेस !-फिलाडेस उगीच नाहक बळी पडत आहे, महाराज !-"

२

ऑरेसेसनें तें पहातांच तो घाबरला व ओरडूं लागला-"त्याचं ऐकूं नका,-तो खोटं सांगत आहे-मीच ऑरेसेस !"

सरदाराचा गोंधळ झाला. तेवढ्यांतच, या दोघा मित्रांचीं एकमेकांना वांचवण्यासाठीं भांडणें सुरू झालीं. दोघेही आपणच ऑरेसेस आहोंत असें ओरडून ओरडून सरदाराला सांगत होते.

एकमेकांच्या मैत्रीसाठीं मृत्यूसारख्या गोष्टीवर त्या दोघांना तसें भांडतांना पाहून, तो जुलमी सरदारच खजील झाला; व त्याचं हृदय द्रवून त्यानें दोघांनाही अभय देऊन मोकळें सोडलें.

★

अमर ज्योति वाङ्मय
संस्थेचे कायम ग्राहक व्हा.

अमर ज्योति वाङ्मय
१ कुतूहल भाग १-२
२ माणसाचें शेंपूट.
[ शास्त्रीय-वाङ्मय ]
जरूर जरूर वाचा !

# जलदेवतेचा न्याय आणि इतर गोष्टी

( परिशिष्ट )

[ भाषेचा अभ्यास ]

**( अ ) कोणत्या नवीन शब्दांचे कल्पनांचे अर्थ व उपयोग आपण शिकलों ?**

[ १ ] घटका, ख्याति, प्रख्यात, खुद्द, सुखवस्तू, कुतूहल, उत्सुक, पोरकट, शेंबडें पोरही, भिस्त, महिन्याच्या-उसन्या-बऱ्या ...नें, वस्तुस्थिति, ख्याली खुशाली, 'खा-पी-मजा-कर', 'वेळीं-अवेळीं, एकलकोंडा, आप्पलपोटा, कंजूष, कष्टाची मीठ-भाकर, स्वीकारणें, अनुरूप, सास्वासारव, खास, आस्था, शेजारधर्म, कार्यसाधूपणा, दिमाख, चुकूनसुद्धां, उधळमाधळ, दबकत दबकत, बऱ्या बोलानें, गळेपडू, शिरजोरी, चारचौघांत, कृतघ्न दरोडेखोरी, चांगुलपणा, आपादमस्तक, आळीपाळीनें, रास्त, साक्षपुरावा, अनुकूल, मनोभावें, रबरबीत, विलंब, कुऱ्यांत, कावेबाजपणें, लटपटी, चौफेर, तिरस्कारयुक्त स्मित, घमेंड, ढोपरभर चिखल, तडजोड, मतलबापुरतं, श्रद्धा, तणतणणें, घमेंडानंदन, ( २ ) पावसाच्या तोंडावर, खतपाणी, ओसाड, उरकणें, जाणीव, ( ३ ) प्रजाजन, सामान्यजन, झुंज, भयानक, शेंपटी चाळवणें, तुंदिलतनु, गगनभेदी, गोंडस, विद्युत्गतीनें, वायुवेगानें, कडकडाट, गौरव, लावण्यलतिका, प्रेमीयुगल, सुखद, मौजेखातर, तुच्छतेनें, गहन. ( ४ ) तांतडी, पल्ला, सुळसुळाट, झपाझप, साक्षिदार, गुपित, छाताड. ( ५ ) यथातथाच, रस्त्याच्या तोंडाशीं, रोकडा, राजबिंडा, उमदा, रुबाबदार, हात घालणें, नेट लावणें, टांग टाकणें, आपोआप, ( ६ ) चांचेगिरी, गाजलेला, यःकश्चित्, मर्यादित, तांडेच्यातांडे, मनमानेल तसा, जगज्जेता, युक्तिवाद, दर्यासारंग.

**( आ ) कोणते वाक्प्रचार-म्हणी आपण शिकलों.**

[१] फिर्याद उभी रहाणें, गुदरणें, लहान तोंडीं मोठा घास घेणें, बाजू घेणें, एखादा मनुष्य फिरणें, एखाद्याला खोटें पाडणें, एकटा जीव असणें, उंटावरून शेळ्या हांकणें, निढळाचा घाम काढणें, जातीनें खपणें, अळंटळं करणें, तोंडांतून चकार शब्द न काढणें, एखाद्या गोष्टींत चूर असणें, एखाद्याकडे हात पसरणें, कोणापुढें तोंड वेंगाडणें, घालमेल चाळणें,

# जलदेवतेचा न्याय आणि इतर गोष्टी

( परिशिष्ट )

## १ भाषेचा अभ्यास

### ( अ ) कोणत्या नवीन शब्दांचे कल्पनांचे अर्थ व उपयोग आपण शिकलों ?

[१] घटका, ख्याति, प्रख्यात, खुद्द, सुखवस्तू, कुतूहल, उत्सुक, पोरकट, शेंबडें पोरही, भिस्त, महिन्याच्या–उसन्या–बऱ्या …नें, वस्तुस्थिति, ख्याली खुशाली, 'खा–पी–मजा–कर', 'वेळीं–अवेळीं, एकलकोंडा, आप्पलपोटा, कंजूष, कष्टाची मीठ–भाकर, स्वीकारणें, अनुरूप, सास्वासारव, खास, आस्था, शेजारधर्म, कार्यसाधूपणा, दिमाख, चुकूनसुद्धां, उधळमाधळ, दबकत दबकत, बऱ्या बोलानें, गळेपडू, शिरजोरी, चार-चौघांत, कृतघ्न दरोडेखोरी, चांगुलपणा, आपादमस्तक, आळीपाळीनें, रास्त, साक्षपुरावा, अनुकूल, मनोभावें, रबरबीत, विलंब, कुऱ्यांत, कावेबाजपणें, लटपटी, चौफेर, तिरस्कारयुक्त स्मित, घमेंड, ढोपरभर चिखल, तडजोड, मतलबापुरतं, श्रद्धा, तणतणणें, घमेंडानंदन, ( २ ) पावसाच्या तोंडावर, खतपाणी, ओसाड, उरकणें, जाणीव, ( ३ ) प्रजाजन, सामान्यजन, झुंज, भयानक, शेंपटी चाळवणें, तुंदिलतनु, गगनभेदी, गोंडस, विद्युत्गतीनें, वायुवेगानें, कडकडाट, गौरव, लावण्यलतिका, प्रेमीयुगल, सुखद, मौजे-खातर, तुच्छतेनें, गहन. ( ४ ) तांतडी, पल्ला, सुळसुळाट, झपाझप, साक्षिदार, गुपित, छाताड. ( ५ ) यथातथाच, रस्त्याच्या तोंडाशीं, रोकडा, राजबिंडा, उमदा, रुबाबदार, हात घालणें, नेट लावणें, टांग टाकणें, आपोआप, ( ६ ) चांचेगिरी, गाजलेला, यःकश्चित्, मर्यादित, तांडेच्या-तांडे, मनमानेल तसा, जगज्जेता, युक्तिवाद, दर्यासारंग.

### ( आ ) कोणते वाक्प्रचार–म्हणी आपण शिकलों.

[१] फिर्याद उभी रहाणें, गुदरणें, लहान तोंडीं मोठा घास घेणें, बाजू घेणें, एखादा मनुष्य फिरणें, एखाद्याला खोटें पाडणें, एकटा जीव असणें, उंटावरून शेळया हांकणें, निढळाचा घाम काढणें, जातीनें खपणें, अळंटळं करणें, तोंडांतून चकार शब्द न काढणें, एखाद्या गोष्टींत चूर असणें, एखाद्याकडे हात पसरणें, कोणापुढें तोंड वेंगाडणें, घालमेल चाळणें,

# १-जलदेवतेचा न्याय !

त्या दिवशीं, जिल्ह्याच्या न्यायाधीशापुढें, जवळच्या एका खेडेगांवच्या पाटलाच्या विरुद्ध एक मनोरंजक फिर्याद उभी राहिली होती.

न्यायाधीश मोठे चाणाक्ष नि चतुर होते. कुठलाहि खटका उपस्थित झाला, तरी अगदीं खऱ्या बाजूला बरोबर न्याय मिळायचा, अशी त्यांची चोहोंकडे ख्याति होती.

त्याच प्रख्यात न्यायाधीशापुढें, अगदीं खुद्द रामजी पाटलांसारख्या श्रीमंत सुखवस्तू माणसाविरुद्ध उभा राहिलेला तो खटला !— नि ती फिर्याद पुन्हा कृष्णंभटासारख्या त्या गांवांतल्या साध्या-सुध्या गरीब माणसानें गुदरलेली.

आजूबाजूच्या गांवांतलीं किती तरी माणसें, मोठ्या कुतुहलानें त्या दिवशीं न्यायकचेरींत जमलीं होतीं. न्यायाधीश आतां त्यांत निवाडा कसा करतात, हें जाणायला सारे अगदीं उत्सुक झाले होते.

जमलेल्या लोकांपैकीं, रामजी पाटलांच्या गांवची मंडळी, आपसांत उघड उघड म्हणत होती—"कृष्णंभटच फार उन्मत्त झालाय्. असा हा लहान तोंडी मोठा घांस घेऊं पहातोय्....भटुरड्यानें मांडलेली फिर्याद अगदीं पोरकट नि कोणालाहि खोटी म्हणून समजण्यासारखी आहे; एखादं रस्त्यांतलं शेंबडं पोरही कृष्णंभटाविरुद्धच निवाडा देईल !"

आणि कृष्णंभटासारख्या गरीबाची बाजू घेणारे फारशे कोणी नव्हतेच गांवांतले.

तो मात्र उगीच बडबड करीत नव्हता. शांतपणें एका बाजूस बसला होता. फारच झालं तर विचारणाऱ्या माणसाला तो म्हणायचा– " मला माहीत आहे बरं, सारं गांव असाच वेडा न्याय देणार तें ! आणि म्हणूनच तर मी माझी भिस्त न्यायाधीशांच्या न्यायीपणावर, चातुर्यावर ठेवली आहे. आतां मी तर निश्चिंत आहे अगदीं ! "

## २

पण तें कृष्णंभट–रामजी पाटील यांच्यामधलं भांडण तरी कसलं होतं तुम्ही म्हणाल ?—

सांगितलं तर हंसाल तुम्ही !–तुपाच्या दोन हंड्यांबद्दलचा तंटा होता तो.

कृष्णंभटाची अशी तक्रार होती, कीं, " रामजी पाटलांच्या मुलीचं लग्न निघालं, सहा महिन्यांपूर्वीं; तेव्हां, त्यांनीं महिन्याच्या बोलीनें, तुपाचे दोन हंडे माझ्याकडून उसने नेले होते. आतां श्रीमंत रामजी पाटील फिरले आहेत. सरळ नेलेच नाहींत असं म्हणतात; मला गरिबाला खोटं पाडतात ! "

त्याच्या गांवचे सगळे लोक खो खो हसूंच लागले.

कारण कृष्णंभटाकडे सगळी एक म्हैस. तो एकटा जीव घरांत. रामजी पाटलांकडे सात म्हशी, हाताखालीं दोन गडी घरांत.

आणि साक्ष नाहीं, लेखी पुरावा नाहीं; आतां कृष्णंभट एकदम उठतो नि वेडा म्हणतो--" सात म्हशीवाल्या रामजी पाटलांनीं एक म्हैस-वाल्या आपल्याकडून दोन हंडे तूप उसन्या बोलीनें नेले ! " कोण खरं मानील तें ?....

रामजी पाटील मोठे म्हणून सारे लोक त्यांच्या बाजूनें बोलत होते; नि वरवर पाहिलें तर कोणालाहि तसेंच वाटलें असतें ! हें खरें; पण खरी वस्तुस्थिति मात्र अगदीं निराळी होती–

## ३

कृष्णंभट नि रामजी पाटील शेजारीं शेजारीं रहात असत.

रामजी पाटलाकडे सात म्हशी नि दोन गडी असले, तरी ते उंटावरून शेळ्या हांकणारे होते. अगदी उधळे होते; ख्यालीखुशालींत चैनीनें रहाणारे होते.

कृष्णंभटाकडे एकच म्हैस होती खरी; तरी तो स्वतः निढळाचा घाम काढून जातीनें खपायचा. तो काटकसरी होता; हिशेबी नि संसारी मनुष्य होता.

रामजी पाटील नेहमीं दशावतार–गंजिफा खेळत बसायचे. गड्यांना मधून मधून हुकूम सोडायचे. नेहमीं चार चौघांना बोलावून श्रीखंड–बासुंदीचे बेत करायचे.

आणि त्यांचे गडी ? आपल्या धन्याचें लक्ष नाहीं, म्हणून, तेहि अळंटळं करायचे–आळसानें झोंपून रहायचें. आज काय म्हणे–'दोन म्हैशींचीं वासरें सुटलीं, दूध प्यालीं;' उद्यां काय म्हणे–'म्हैशीनें चरवी-वर लाथ मारली;' परवां काय म्हणे–' दूध ऊतूं गेलें किंवा नासलें' असें नेहमीं चालायचें.

मग लोण्या-तुपाचा सांठा होणार तरी कसा रामजी पाटलांकडे ?–

उलट, कृष्णंभट मात्र, एकटा होता तरी प्रत्येक बाबतींत काळजी घ्यायचा स्वतः; आणि म्हणूनच, थोडें थोडें करतां करतां, मोठ्या श्रमानें कांटकसरीनें दोन हंडे तूप सांठवलें होतें त्यानें !–

पण त्याबद्दलच, ' खा–पी–मजा कर ' असें वागणारे त्याचे शेजारी रामजी पाटील, कृष्णंभटाची वेळीं अवेळीं थट्टा करीत. त्याला स्वार्थी, एकलकोंडा, आप्पलपोटा, कंजूष अशी विशेषणें देत—

त्यावर कृष्णंभट मात्र तोंडांतून चकार शब्दही काढीत नसे.

आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गानें, आपल्या उद्योगांत तो अगदीं चूर असे. बरें, त्याला कशाकरतां कोणाकडे कधी हात पसरायची किंवा

तोंड वेंगाडायचीही संवय नव्हती. तो म्हणे–' रोज दोन वेळ कष्टाची मीठभाकर देणारी आपली गरीबी बरी, कीं आपण बरे ! '

## ४

असेच दिवस चालले होते. एके दिवशीं रामजी पाटलांकडे सनई-चौघडे वाजूं लागले. त्यांच्या घरा त्यांच्या मुलीचें लग्न निघालें होतें.

रामजी पाटलांनी सर्व बड्या बड्या लोकांना वाजत गाजत अक्षता वाटून आमंत्रण दिलें.

पण कृष्णंभटासारख्या गरीबाला त्यावेळीं, मुद्दाम कोण विचारतो ?–

पाटलांच्या घरांत तर पक्वान्नांची घालमेल चालली होती. लाडू, करंज्या, जिलब्या, मांडे, घीवर....! रामजी पाटलांच्या दर्जाला शोभेसाच मुलीच्या लग्नाचा थाट उडायला पाहिजे होता ना ?

पण अगदीं मेजवानीच्या दिवशीं, ऐन वेळीं रामजी पाटलांच्या लक्षांत आलें, ' जांवईबापूंच्या विशेष पक्वान्नांसाटीं नि अनूशुधीसाटीं साजूक तूप नाही आपल्याकडे !'

त्यांच्या डोक्यांत एकदम एक कल्पना आली. त्यांनीं पागोटें चढवलें; नि स्वतः जातीनेंच ते कृष्णंभटाकडे गेले शेजारीं....

## ५

घराच्या परसांत, कृष्णंभट पंचा लावून म्हैस धूत होता. तेथें पाटील स्वतः गेले नि हंसत हसत सारवासारव करूं लागले, " कृष्णंभटजी ! कालच्या साऱ्या गडबडींत, अगदीं शेजारीं तुमच्याकडे आमंत्रणाला यायचं मात्र साफच राहून गेलं–त्याबद्दल राग मानूं नका !.... लग्नाला या तुम्ही ! ब्राह्मणांनीच स्वयंपाक केला आहे. ब्राह्मणांची पंगत निराळी खास आहे. तुम्ही आलंच पाहिजे बरं कां लग्नाला, नि जेवणावळीला ? "

आपल्या गांवचे हे पाटील ! अगदीं स्वतःच आमंत्रणाला आल्यावर, कृष्णंभटाला आनंद कां बरं होणार नाहीं ? त्यानें टोपी घालून रामजी पाटलांच्या हातीं शुभ नारळ दिला व पाटलांचें आमंत्रण आनंदानें स्वीकारलें.

पण रामजी पाटील परत फिरतां फिरतां मात्र जरा घुटमळले. कृष्णंभटाला प्रथम समजलें नाहीं, 'कां' तें; तेव्हां त्यांनीं आस्थेनें कारणाबद्दल चौकशी केली.

त्यावर रामजी पाटील म्हणाले, " अहो, हा लग्नाचा बोवाळ मोठा वाईट बुवा. घरांत सात म्हशी आहेत. पण आतां वेळेवर साजूक तूप पाहिजे म्हटलं, तर घरांत थेंब नाहीं आज ! काय करावं मोठा प्रश्नच पडला आहे...."

'पाटलांच्या त्या लग्नघाईंत, आपण त्यांना उपयोगी पडणं, हें आपलं शेजारधर्माचं कर्तव्य आहे.' असें कृष्णंभटाला वाटलें. आणि तो पटकन् म्हणाला–" अहो त्यांत काय आहे पाटील ?—थोडं थोडं करून माझ्याकडे चांगले दोन हंडे तूप झालंय. त्यांतलं जा कीं घेऊन, पाहिजे तर थोडं ! "

आणि पाटलांना तेंच तर पाहिजे होतें. ते एकदम आनंदून कार्यसाधूपणें म्हणाले—" होय ना ?....वा वा....भटजी, देव भेटलांत बुवा तुम्ही !—मला तुमचे दोन्ही हंडेच द्या ना उसने आज ! कारण वेळेवर किती लागेल याचा आतांच अंदाज करतां येत नाहीं ! महिन्याभरानें मात्र मी परत करीन तुमचं ! अहो, त्यांत काय आहे ?....सात म्हशी आहेत माझ्या ! आतां लग्न निघालं घरांत म्हणून एवढी धडपड ! नाहींतर कोण तुपाला विचारीत होतं ?—"

कृष्णंभटानां पाटलांच्या त्या दिमाखाचा मनांत थोडा राग आला; पण कांहीं न बोलतां घरांतले दोन्ही हंडे त्यांनीं पाटीलबुवांच्या पुढें केले; आणि म्हटलें, " तुमची आजची नड तर भागतय ना माझ्या तुपामुळें ?

मग त्यांत मला आनंदच आहे ! पण महिन्याभरांत परत करा हो मात्र तें ! माझ्या गरीबाचा हा पोटाचा धंदा, एकट्या म्हशीवर चाललेला..."

"होहो, काळजी नको तुम्हाला अगदीं ! बरं !....या बरं भटजी लग्नाला नि मेजवानीला ! नाहींतर रागावेन् मी तुमच्यांवर ?"

पाटील एवढें बोलले नि आपल्या गड्यांकरवी ते हंडे घेऊन आपल्या घरीं निघून गेले.

## ६

पाटील बुवांकडचें लग्नकार्य निर्विघ्न पार पडलें.

मग त्यांचा पुन्हां नेहमींचा कार्यक्रम सुरू झाला.

सुरुवाती सुरवातीला कृष्णंभटाचे उसने घेतलेले तुपाचे हंडे परत करण्याची पाटीलबुवांच्या मनाला टोंचणी लागे. पण पूर्वींची उधळमाधळ एकाएकी थांबणार होती थोडीच ! मग सात म्हशी घरांत असल्या तरी तूप सांठणार कसें ?

महिन्यांमागून महिने जाऊं लागले; शेवटीं तर त्यांना दुसराच विचार सुचूं लागला.

ते मनांत म्हणूं लागले " आपण तर गांवचे पाटील !–गांवातल्या साऱ्यांची नेहमीं काळजी घेतों ! मग काय झालं एखाद्या वेळीं कृष्णंभटानें दोन हंडे तूप दिलं आपल्याला तर ?–ऐवीतेवी तुपाचा सांठा आपल्या घरीं होतच नाहीं ! मग मी एकदम 'घेतलंच नाहीं' असं म्हटलं, तर तो काय करणार आहे बेटा ?–लोकांना माझंच खरं वाटणार!–"

आणि या विचारानें, शेवटीं, पाटील साफ बेफिकीर झाले ! कृष्णंभटाचे उसने आणलेले तुपाचे हंडे पार विसरले !

कृष्णंभट मात्र अगदीं सज्जन होता. 'आज नाहीं उद्यां देतील पाटील आपलं तूप' असा विचार करून, तो कधीं पाटलांकडे चुकूनसुद्धां टुमणें लावायला गेला नव्हता !

७

पण शेवटीं, त्याचाही नाइलाज झाला ?–'लग्नकार्य उरकून चांगले सहा महिने झाले; तरी रामजी पाटील, अजून नेलेलें तूप परत करण्याची भाषाच काढत नाहींत!' हें पाहून, एके दिवशीं दुपारीं, कृष्णंभट जरा दबकत दबकतच पाटलांच्या वाड्यांत शिरला.

मित्रमंडळीबरोबर, पाटील दशावतार खेळत बसले होते. कृष्णंभटाला ओटीवर चढतांना पाहून, जणुं काय, 'आपला–त्याचा संबंधच नाहीं' अशा तोऱ्यानें, पाटलांनीं त्याच्याकडे पाहिलें. त्याला 'या बसा' देखील म्हटलें नाहीं.

थोडया संकोचानें, उभ्या उभ्याच कृष्णंभट म्हणाला, "पाटील, जरा खाजगी बोलायचंय् तुमच्याशीं मला...."

आपल्या मित्रमंडळीकडे एकदां पाहून, खेळतां खेळतां वर नजर करीत पाटील बेफिकीरीनें म्हणाले—"तुमचं–नि माझ्याशीं खाजगी काम ? तें काय असणार बुवा ? सांगा की इथेंच."

तेंव्हां मात्र कृष्णंभटाचा निरुपाय झाला.

आपल्या उसन्या नेलेल्या तुपाच्या हंडयांची, पाटीलबुवांच्या मित्रमंडळीदेखत त्यानें उघड उघड मागणी केली त्यांच्याकडे.

अशा वेळीं कांय करायचें, तें सारें पाटीलबुवांनीं आधींच ठरवलें होतें !

तेंव्हां, थोडया रागानें, पण तरी वर वर शांतपणें ते म्हणाले.... "तुमचं डोकं फिरलेलं तर नाहीं ना, भटजी ?....काय बोलत आहां त्याची शुद्ध नसावी तुम्हाला ! हें कोणी ऐकलं तर हसतील नि शेण घालतील तोंडांत तुमच्या !"

८

आणि खरोखरच पाटीलबुवांची मित्रमंडळी हसत होती कृष्णंभटाला त्याचवेळीं....

मग मात्र, कृष्णंभटाला आपला राग आवरेना. तो चिडून पाटलांना म्हणाला–" तुमच्यासारख्या गांवच्या पाटलाला शोभत नाहींत, हे उलट्या काळ्जाचे धंदे !—बऱ्या बोलानें माझं तूप द्या मला ! ".

" अरे वारे, भटा ! बराच धीट झालास की उद्धटा !" पाटील हातांतील खेळाची पानें फेकून रागानें उठत म्हणाले–" लाज कशी नाहीं वाटत तुला ?—माझ्या घरांत सात म्हशींचं दुभतं असतांना, मी तुझ्या सारख्या एक म्हैशीवाल्या दरिद्र्याकडे तूप उसनं मागायला येणार ?.... कोणी शहाणा खरं तरी कसं म्हणेल हें ?....भिकारडा ! गळेपडू शिरजोरी करायला आला चारचौघांत !....आतां बऱ्या बोलानें, चालता हो, इथून जीव घेऊन, आल्या पावलीं...."

कृष्णंभट तर नाहक अपमानाच्या रागानें थरथरूं लागला. पाटलांची कृतघ्न दरोडखोरी त्याला सहनच होईना.

शब्दानें शब्द वाढत गेला; जवळपासचे पुष्कळ लोक जमले.

पण साऱ्यांना कृष्णंभटाचें म्हणणें खरेंच वाटेना.

त्यांनीं सर्वांनी मिळून, शेवटीं त्यालाच त्याच्या घरीं हांकललें.

' आपलं तूप गेलं, आपला चांगुलपणा उकिरड्यावर पडला, नि वर आपली चारचौघांच्या देखत बेअब्रू झाली !' या विचारामुळेंच कृष्णंभट चुरशीला पेटला.

त्याला आतां त्याचें तूप नको होतें. खरा न्याय पाहिजे होता.

म्हणूनच कृष्णंभटानें शेजारच्या मोठ्या गांवच्या न्यायाधीशाकडे ती फिर्याद गुदरली. आणि तोच तो आज चालू असलेला ' रामजी–कृष्णंभट खटला '—

## ९

झालें; कज्जा सुरू झाला.

त्या चाणाक्ष न्यायाधीशांनीं, दोघांकडेही अगदीं आपादमस्तक

पाहिलें. मग निमूटपणेंच दोघांचे चेहरे न्याहाळून, आपला चेहरा गंभीर केला.

न्यायदान पहायला जमलेली मंडळी, अगदीं गुपचूप बसून मोठ्या उत्सुकतेनें तिघांकडे आळीपाळीनें पहात होती.

" कृष्णंभटजी, तुमचा साक्षीदार कोण ?–" न्यायाधीश शेवटीं गंभीर आवाजांत म्हणाले.

" दुसरं कोणीच नाही महाराज !–माझं निष्पाप मन नि रामजी पाटलांचा शब्द, हेच माझे दोन साक्षीदार !–पाटलांचा शब्द फिरला–माझं मन मात्र मला अजून साक्ष देत आहे !–" कृष्णंभट शांतपणें म्हणाला.

' तुमचं काय म्हणणं, रामजी पाटील ?' न्यायाधीश त्यांच्याकडे वळून म्हणाले.

" आपल्याला सारी हकीकत माहीत झालींच आहे आतां, महाराज !" रामजी पाटील नाटकी आदबीनें म्हणाले–" हा भटजी खोटं बोलतोय् साफ, हें आपल्यालाही समजलंच असेल !—"

" रास्त आहे तुमचं एका दृष्टीनें–" न्यायाधीश पाटलांना म्हणाले. " पुन्हा कृष्णंभटांना कोणी साक्षीदार नाही !–नुसता तर्क चालवला तर ते फिर्याद आतांच हरले आहेत. तुम्ही निरपराधी आहांत—"

न्यायाधीशाचे ते उद्गार ऐकून, रामजी पाटील एकदम खूष झाले. आणि कृष्णंभटाकडे तुच्छतेनें पाहूं लागले.

इतक्यांत, न्यायाधीश पुढें म्हणाले—" तर मग आतां साक्षपुरावा नसलेली ही तक्रार ! माझ्यापुढें आलीच आहे. तेव्हां शास्त्राला धरून दुसरा कांहीं मार्ग शोधून, मला न्याय हा दिला पाहिजेच ! पाटील, तुमचा विश्वास आहे ना ?"

पाटलांना वाटलें,–' कसला का मार्ग असेना; आतां न्यायाधिशाचं मत उघड उघड आपल्या बाजूला अनुकूल झालंच आहे !'

ते पटकन् म्हणाले–" हें काय बोलणं, महाराज ?–आपण सुचवाल तें योग्यच होईल...."

## १०

" बरं तर...." न्यायाधीश दोघांकडे पाहून म्हणाले, " भूमी, सूर्य, पाणी यापैकीं कोणा तरी एकाला साक्ष ठेऊन सांगण्याची अशा वेळीं शास्त्र अनुमती देतं ! तेव्हां, ती पहा समोर खाडी आहे. अगदीं गपचूप जा पुढें ! नि तेथल्या पाण्याला मनोभावें स्पर्श करा; खरं बोलूं अशी शपथ घ्या मनांत. नि परत या. सांगाल तें ऐकून मी योग्य तो न्याय देतों. "

समोर लांबपर्यंत खाडी पसरली होती. ओहोटीमुळें पाणी अर्धा फर्लांग आंत गेलें होतें. मध्यें खूपखूप चिखल झाला होता रबरबीत; पाण्याला स्पर्श करायचा म्हणजे चिखल तुडवत जाणें भागच होतें.

न्यायाधीशांनीं तें सांगतांच, कृष्णंभट, विलंब न करतां निमूट, त्या दिशेनें चालूं लागला.

पण तो चिखल पाहून, जरा कांकू करीत पाटील न्यायाधीशांना म्हणाले, " महाराज, मी पाण्यापर्यंत घोडयावरून गेलों तर ? किंवा माझ्या दोघा गडयांच्या खांद्यावर हात टाकून, पाय कोरडे ठेऊन गेलों तर ? चालेल ना ? मध्यें फार चिखल आहे म्हणून विचारतों !"

" चाललं असतं पाटील !" न्यायाधीश हंसून म्हणाले, " पण, पाणी हा साक्षात् देव ! अशा वेळीं त्याच्या जवळ चालतच जाऊन स्पर्श करायला पाहिजे. ते कृष्णंभट गेले पहा पुढें. "

तेव्हां शेवटीं, अगदीं नाइलाजानें पाटील चिखलातून चालूं लागले.

## ११

पाण्याला स्पर्श करून कृष्णंभट व रामजी पाटील दोघे बरोबरच परत येत होते.

येतां येतां न राहवून कृष्णंभट पाटलांना हळूंच म्हणाला, "पाटील, तूप देऊं नका पाहिजे तर! पण खरं कबूल करून टाका! मी तुमच्या वांटेलाही कधीं गेलों नव्हतों. उलट, तुमच्या नडीला तुम्हाला मदत केली! तरी पुन्हां कां माझी गरीबाचीच बेअब्रू करतां?"

जवळ कोणी नाहीं ही खात्री असल्यामुळें, पाटील कुर्ऱ्यांतच म्हणाले, "गप्प बस, भटा! एकदां झालं तें झालं-आतां चार चौघांत कबूल करून माझ्या हातानें माझी अब्रू गमावून बसणार नाहीं मी! पुन्हां, निवाडा तुझ्याविरुद्ध जाणार, हें दिसतंच आहे!"

न्यायाधीश लांबून दोघांकडे लक्षपूर्वक पहात होते.

सर्व मंडळीही आतां पुढें काय होतें तें पहायला उत्सुक झाली होती.

## १२

रामजी पाटील व कृष्णंभट, दोघे जवळ येतांच न्यायाधीश थोड्या रागानें म्हणाले—"या दिव्यांतून पार पडतांना कोणी कोणाशी बोलायचं नसतं, कृष्णंभट!—तुम्हीच प्रथम बोलूं लागलांत, हो ना? पाहिलं मी!—कां बरं बोललांत?"—

"मला राहवेना, महाराज—" कृष्णंभट अजीजीनें म्हणाला.

"हे काय बोलले हो पाटील?—" न्यायाधीशांनी मुद्दाम पाटलांकडे वळून विचारलें.

पाटलांची आतां मात्र खात्रीच झाली. न्यायाधीश आपलीच सारखी बाजू घेत आहेत. तेव्हां सगळं न सांगतां, पाटील कावेबाजपणें म्हणाले, "महाराज, कृष्णंभट म्हणत होता 'माझी गरीबाची बेअब्रू कां करतां?'"—

"हो ना?—वाटलंच मला, हे भटजी असल्या लटपटी करतील, म्हणून!–" न्यायाधीश क्षणभर थांबून हसत कृष्णंभटाकडे पाहून म्हणाले. "बरं, आतां तुमचे पाय चिखलानें माखले आहेत दोघांचे;

तेव्हां ते आधीं धुवून घ्या. नि पटकन् माझ्यासमोर या. मग न्याय सांगतों मी !—"

## १३

न्यायाधीशाच्या नोकरानें रामजी पाटलांपुढे एक भरलेली कळशी ठेवली व कृष्णंभटाच्या समोर एक राजापुरी तांब्या ठेवला.

असल्या प्रत्येक गोष्टीनें, पाटील खूष होत होते. 'आतां आपणच कज्जा जिंकणार '—अशी खात्री झाली त्यांची.

पण रबरबीत चिखलांत चालायला लागल्याबद्दल मात्र, त्या न्यायाधीशांचा त्यांना राग आला होता ! तसल्या रागारागांतच त्यांनीं कळशीतल्या पाण्यानें आपले पाय धुतले.

कृष्णंभटानें आपल्या समोर ठेवलेल्या तांब्याकडे एकदां पाहिलें.

मग नेहमीच्या संवयीप्रमाणें थोडा विचार केला. चौफेर दृष्टी फिरवली. थोड्या अंतरावर न्यायाधीशांच्या घोड्यासमोर गवत घातलेलें दिसलें त्याला. त्यानें तेथें जाऊन, थोडया गवतानें प्रथम पायाचा चिखल साफ पुसला. मग तांब्यांतल्या थोडथोडया पाण्यानें हळूहळू दोन्ही पाय धुवून व न्यायाधीशासमोर जाऊन, तो निमूट उभा राहिला.

रामजी पाटीलही तोंपर्यंत त्यांच्याजवळ येऊन उभे राहिले होते.

इतक्यांत न्यायाधीश म्हणाले—' कृष्णंभट, पाटील, ठरला माझा न्याय ! कोणाला आतां कांहीं बोलायला नको !—कसला जाब द्यायला नको !—लबाड कोण तें सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट दिसत आहे मला !—"

## १४

रामजी पाटील जिंकणार या खात्रीनें जमलेली मंडळी न्यायाधीशाकडे पाहूं लागली.

कृष्णंभट तरीही शांतपणें उभा होता.

पण पाटीलांनीं फाजील खात्रीनें न्यायाधीशांना पटकन् विचारलें-
“ कोणाला लबाड ठरवलंत, महाराज ?—”

न्यायाधीश जरा रागानें व कठोरपणें उलटून उत्तरले, “ तुम्हींच बरं, रामजी पाटील ! तुम्हींच !”

पाटलांसकट सारे एकदम दचकले; कृष्णंभट गप्प उभा होता.
“ तुम्हाला महिनाभर कैदेची शिक्षा मिळेल आतां ! तुमची पाटिलकी काढून घेण्यांत येईल. आणि कृष्णंभटांना तुम्ही तुपाचे दोन हंडे परत करून आणखी तिसरा एक त्यांना झालेल्या त्रासाबद्दल दंड म्हणून द्यायचा ! समजला माझा न्याय !” न्यायाधीशांनीं आपला निवाडा पुरा केला.

“ क....का....काय ? ” पाटीलबुवांची बोबडी वळून, ते म्हणाले.
“ असा कसा न्याय ठरेल ? ”

“ गप्प रहा ! त्या खाडीतल्या जलदेवतेनेंच न्याय दिला हा ! ” न्थायाधीश तिरस्कारयुक्त स्मित करून म्हणाले.

सर्वजण टकमका न्यायाधीशांकडे नि रामजी पाटलांकडे पहात राहिले.

## १५

“ महाराज !” इतका वेळ कांहीं न बोलतां सारें करीत असलेला कृष्णंभट, आदबीनें हात जोडून, न्यायाधीशांना एकदम म्हणाला, “ पाटील जरा घमेंडीत गेले; त्यामुळेंच सारी लबाडी घडली त्यांच्या हातून ! तरी पण, आपण इतकी जबर शिक्षा देऊं नये त्यांना. दया करावी त्यांच्यावर ! मलाच एवढी भीक घालावी !”

तें ऐकून न्यायाधीश पुन्हा हसले व मग पाटलांना म्हणाले, “ घ्या, घ्या. पाटील ! शेजारधर्म, न्यायीपणा, विनम्रपणा नि दयाशीलपणा हे गुण कृष्णंभटांकडून घ्या—आतां त्यांची क्षमा मागून प्रथम अपराध कबूल करा. मग ते सांगतील तोच न्याय मी कायम करतों !—”

दुसऱ्याही कोणाला, साक्षीपुराव्याशिवाय केवळ शब्दावर विश्वास ठेवून कांहींहि देईल ! उलट, पाटलांसारख्या घमेंडानंदन, ऐदी, लबाड माणसाला सात म्हशी घरांत असून सुद्धां, तुपाची जरूर पडेल, नि शेवटीं, तो असली खोटी फिर्यादही मांडेल !"

न्यायाधिशाच्या त्या साऱ्या तर्कचातुर्याचें कौतुक करीत जमलेलीं सारीं माणसें आपापल्या घरीं परतलीं.

★


– अमर ज्योति वाङ्मय –

गीत-ज्योती

[ बाल-बालिकांचा अभिनव सचित्र काव्य-संग्रह ]

'प्रफुल्लचंद्र'

[ उद्बोधक चरित्र-वाङ्मय ]

– कथा-वाङ्मय –

१ नशीबाची परीक्षा. ३ मडक्यांतला न्याय.
२ आजिंक्य पंडित. ४ सत्यकथा.

जरूर जरूर वाचा !

# २-जमिनीतले गोटे

व

# जमिनीवरचा चारा

श्रीपती मोठा कष्टाळू शेतकरी होता. त्याच्या शेतांत तो धान्य पिकवी; पण त्याला व त्याच्या बायकापोरांना वर्षभर तेवढें पुरें पडत नसे.

त्याच्या शेताशेजारींच एक मोठा ओसाड माळरानाचा तुकडा पसरला होता. त्याच्याकडे कित्येक वर्षें कोणी ढुंकूनही पाहिलें नव्हतें. तेव्हां एके दिवशीं श्रीपतीनें स्वतःशीच विचार केला; या जमिनीचा उपयोग करावा; त्यानें त्याला बांध घातला; नांगर धरला, व तो तें शेत लावण्याच्या कामाला लागला. कित्येक दिवस उन्हातान्हांत खपून त्यानें तें ओसाड शेत सारें चांगलें नांगरलें.

तो आतां त्यांत कांहीं पेरणार, तोंच, अगदीं पावसाच्या तोंडावर, त्या शेताचे मालक शेटजी त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे राहिले. आणि आपली मालकी गाजवीत, त्यांनीं श्रीपतीला एकदम शिवीगाळ सुरू केली.

श्रीपती शेठजींना शांतपणें म्हणाला—" महाराज, ही जमीन आपली असेल; तशीच ती देवाचीही आहे! आपण जमिनीकडे आजपर्यंत दुर्लक्ष केलें; म्हणून देवानेंच मला तिची मशागत करायची बुद्धी दिली."

" देव बीव मी कांहीं जाणत नाही!" शेटजी कुर्‍यांत म्हणाले. " माझ्या जमिनींत माझ्या परवानगीशिवाय तूं असा धुमाकूळ माजवलास तर तुला तुरुंगात पाठवीन मी!—सांगून ठेवतों!"

# २

श्रीपतीनें पाहिलें—“ कायदा तर शेटजींच्या बाजूचा आहे. आपण केलेली सारी मेहनत जाईल फुकट !....त्यापेक्षां आपण त्यांच्याशीं मिळतं घ्यावं.”

तेंव्हां तो आदबीनें शेटजींना म्हणाला—“ इतक्या थराला कशाला जातां, मालक ?– शेतांत जें पिकेल त्याचा निम्मा भाग तुम्ही घ्या....निम्मा मला द्या....मीच सारे श्रम, खतपाणी करणार !— मग झालं कीं नाहीं ?”

पण शेटजी होते पक्के स्वार्थी;....श्रीपतीवर ओरडून त्याला दमांत घेत ते म्हणाले, “ तें कांहीं नाहीं. पहिली कांहीं वर्षे तूं जें पीक काढशील, तें सारंच्या सारं तूं मलाच दिलं पाहिजेस !”

मालक शेटजींचा तो स्वार्थीपणा पाहून श्रीपतीला मनांत खूप राग आला. त्यांच्याबरोबर जशास तसेंच वागायचें ठरवून टाकलें त्यानें. आणि तो शेटजींना कावेबाजपणें म्हणाला, “ तसं का होईना, मालक ! आतां एवढंच मला सांगा....शेतांत जें पिकेल त्यांतलं तुम्हाला जमिनी-वरचं द्यायचं का जमिनीच्या पोटांतलं ?”

शेटजींना शेतीची कुठे काय माहिती होती ? त्या प्रश्नानें गोंधळून जाऊन त्यांनीं म्हटलें, “जमिनीच्या पोटांत रे काय मिळणार ? दगड-धोंडे ? ते घे तुलाच !!”

श्रीपती हळूच हसला व म्हणाला, “ बरं मालक, तुम्ही या वर्षी जमिनीवर पिकेल तें घ्या. मी आपले जमिनीच्या पोटातले खडे माझ्या-पोटांत भरेन !”

शेटजी आपली मालकी गाजवून, मोठ्या समाधानानें घरीं निघून गेले.

# ३

त्या वर्षीं, श्रीपतीनें बटाटा, कांदा, भुईमूग वगैरेचें बी शेतांत पेरलें. शेटजींकडे शेवटीं सुकलेल्या रोपट्यांचे भारेच्या भारे नेऊन टाकतांना तो म्हणाला—" घ्या, मालक !–हा कराराप्रमाणें आपला हिस्सा!"

शेटजी चिडले. मोठमोठ्यानें ओरडूं लागले. म्हणाले, " हा काय बदमाशपणा चालवला आहेस ? "

श्रीपती शांतपणें म्हणाला—" मालक, माझं काय चुकलं—ठरल्याप्रमाणें जमिनीवर पिकलेलं सारंच्या सारं आपल्याकडे आणून टाकलं—एक काडी देखील मी माझ्या घरांत ठेवली नाही! सांगितलंत, तसे जमिनीत पिकलेले खडे तेवढे मी पोटांत घातले!—"

शेटजींचा नाइलाज झाला. ते रागांतच म्हणाले " बरं बरं! आतां पुढल्या वर्षी—"

" हो, तें राहिलंच! काय करूं सरकार ? " श्रीपती अदबीनें त्यांना म्हणाला.

" पुढल्या वर्षी जमिनीच्या पोटांत जें पिकेल तें सारंच्या सारं माझ्याकडे आणून घाल ! " शेटजी ऐटींत म्हणाले.

" सारंच्या सारं ? " श्रीपती अचंब्यानें म्हणाला. " मालक, विचार करा जरा! सारं आपल्याला देऊन मग मी काय खाऊं ? "

" तूं खा हा असला जमिनीवरचा चारा–पाचोळा! " शेटजी निष्ठुर अंतःकरणानें म्हणाले. " मला जमिनींतलं सारंच्या सारं मिळालं पाहिजे! नाहीं तर पडूं द्या माझी जमीन ओसाड!"

श्रीपतीनें मनांत पुन्हां निराळीच खूणगांठ बांधली, नि तो जातांना म्हणाला, " बरं धनी, पुढल्या वर्षाला मी जमिनीच्या पोटांत पिकेल, तें सारंच्या सारं आपल्याकडे लावून देईन! मी त्यांतलं कांहीं ठेवणार नाहीं स्वतःसाठीं! झालं? ठरला करार!"

तो कबुलीजबाब ऐकून शेठजी पुन्हा खूप झाले!

## ४

श्रीपतीनें त्या वर्षीं, त्या शेतांत, बाजरी–गहूं–हरभरा लावला; वांगी, भेंडे, टोमॅटो, माठ वगैरे भाजीपाला केला.

वर्षाशेवटीं शेटजींच्या अंगणांत पुन्हां सुकलेल्या रोपटांच्या मुळांपासच्या ढेकळांची रास श्रीपतीनें मारली.

तें पाहून, शेटजी पुन्हां भयंकर चिडले. ते मोठ्यानें ओरडून रागानें थरथर कांपत म्हणाले, "अरे....अरे....शिरप्या, हें काय, गधड्या?"

"मालक, उगीच शिवीगाळ नका करूं! हा आपला ठरलेला करार!" श्रीपती शांतपणें म्हणाला, "या वर्षीं जमिनीच्या पोटांतलं कांहींसुद्धां मी माझ्यासाठीं ठेवलं नाही. जमिनीवर पिकलेला चारा पाला तेवढाच माझ्या घरांतल्या बेगमीसाठीं मी वापरला! बाकी सारंच्या सारं हें तुमच्यासमोर आहे! देवाची शपथ!"

सारं लक्षांत येऊन शेटजी खूप वरमले. 'श्रीपती चाणाक्ष नि हुशार आहे. कष्टाळू आहे' हें त्यांना आतां पक्कें समजलें. 'तो पिकवेल त्यावरच आपला फायदा आहे. आपला फायदा–तोटा करणं त्याच्याच हातीं आहे नि पुन्हा साराच फायदा आपण अपेक्षिणें बरोबर नाही.' याची त्यांना पूर्ण जाणीव झाली.

## ५

श्रीपती जायला उठतां उठतां, शेटजींना म्हणाला–"मालक, आतां पुढल्या वर्षाच्या पिकाची व्यवस्था काय करायची? सांगा! आधीं ठरलेलं बरं!–"

शेटजी श्रीपतीच्या त्या खोंचक प्रश्नानें नरमले; त्यांनीं पुन्हां लाजेनें खालें मान घातली; हळूंच श्रीपतीला ते म्हणाले—"श्रीपती, चुकलं

माझं !—मी कसला मालक जमिनींचा ?....तूंच तिला पाहिजे तें करायला लावतोस !....या वर्षापासून माझ्या कांहीं अटी नाहींत ! तुला मला जेवढं द्यावेसं वाटेल तेवढं दे. त्यांतच मी संतुष्ट आहे ! ”

श्रीपती आनंदून कृतज्ञतेनें म्हणाला—“ मालक, आतां कसं लाख बोललांत ! पिकेल त्यातलं योग्य तितकं तुम्हाला देईल !—या दोन वर्षांचंही तुमचं निम्मं पीक मी निराळे कणगे भरून ठेवलं आहेत. ”

“ अहंकू !–नाहीं, श्रीपती !”—शेटजी पश्चात्तापानें म्हणाले, “ तें मात्र आतां तू देऊनही मी घेणार नाहीं !–माझ्या दुष्ट स्वभावाचें प्रायश्चित्त मला चांगलंच मिळालं !—आणि तुझ्या चातुर्याचं व कष्टाचं तुला तें फळ मिळालं !....”

★

# ३-प्रेमाची किंमत–

१

त्यावेळीं करमणूक म्हणून मोठ्या वर्तुळांत हिंस्र पशूंच्या क्रूर झुंजी लावल्या जात. नि तासन् तास त्या पहात, राजासकट सारे सरदार व प्रजाजन आपल्या जिवाची करमणूक करीत.

एके दिवशीं, फ्रान्सिस राजा असाच खेळ पहाण्यास बसला होता. त्याच्या भोंवती त्याच्या दरबारांतील अनेक सरदार दरकदार घराण्यांतील तरुण–वृद्ध स्त्री–पुरुष बसले होते. सामान्यजनही बसले होते.

आंतल्या वर्तुळांत मस्त पशूंच्या झुंजीस सुरवात होणार होती. सगळीकडे गडबड-गजबज चालली होती.

## २

इतक्यांत, राजानें आपल्या सेवकांना खूण केली. सारी एकदम शांतता झाली चोहूंकडे.

राजाची मान हलली. वर्तुळाच्या एका दारांतून एक भयानक सिंह डुलत डुलत आंत आला.

त्यानें एकदां इकडे तिकडे गंभीरपणें, पाहिलें व शेंपटी चाळवून-आपटून तो वर्तुळाच्या मध्यावर जाऊन बसला.

राजाची मान पुन्हा एकदां हलली! तत्काळ दुसरा दरवाजा उघडला गेला.

त्यांतून एक मस्त वाघ बाहेर पडला. सिंहाला समोर पहातांच, त्यानें एक भयानक डरकाळी फोडली. थोडा वेळ गुरगुरत भोंवतीं पाहून, सिंहापासून थोड्याच अंतरावर तोही जमिनीवर स्वस्थ बसला.

राजाची मान तिसऱ्यांदा हलली. लागलींच तिसरा एक दरवाजा उघडला गेला.

आंतून दोन तुंदिलतनु बिबळे वाघ उड्या मारत वर्तुळांत शिरले.

वाघाला समोर पहातांच, दोघेही बिबळे त्याच्यावर उडी टाकून गेले. पण वाघानें आपल्या पंजांनीं त्यांना अगदीं लीलेनें बाजूला सारलें.

त्यावेळीं त्या तिन्ही प्राण्यांनीं फोडलेल्या गगनभेदी डरकाळ्यांनीं साऱ्या प्रेक्षकांच्या कानठळ्या बसल्या. कित्येकांच्या अंगावर भीतीनें रोमांच उभे राहिले. कांहीं बायकामुलें अर्धवट बेशुद्ध पडलीं!

## ३

ते अक्राळ विक्राळ चार प्राणी, निरनिराळ्या ठिकाणीं तसे टपून बसल्यामुळें, भोंवतीं अगदीं भयानक शांतता पसरली होती. श्वास कोंडून 'पुढें काय होतं,' या उत्सुकतेनें वर्तुळाकडे पहात होते सारेजण!—

तेवढ्यांतच वाघ व सिंह बसले होते त्यांच्या दरम्यान, त्या वर्तुळांत एक गोंडस हातमोजा हवेंतून उडत जाऊन पडला.

राजासकट सगळे दचकून भोंवतीं पाहूं लागले.

सरदारांच्या जागेकडूनच तो हातमोजा उडाला होता; नि तेथें एक सरदाराची सौंदर्यखानी मुलगी उभी होती.

आपल्या शेजारच्या तरुण सरदाराला ती सहास्य म्हणत होती– " नेहमीं तुम्ही मला म्हणतां ना, कीं, तुमचं माझ्यावर फार फार प्रेम आहे ? त्यासाठीं तुम्ही वाटेल तें कराल ?....मग जा तर !....तो माझा हातमोजा आत्तांच्या आतां आणून द्या मला परत ! "

४

त्या देखण्या रुबाबदार तरुण सरदारानें तिच्याकडे एकदां निरखून पाहिलें. क्षणभर त्या मृत्यूच्या वर्तुळाकार जबड्याकडे दृष्टि टाकली.

आणि मग....काय होतं आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत येण्यापूर्वींच त्यानें ताडकन् त्या भयप्रद हिंस्र पशूंच्या वर्तुळांत उडी मारली.

वाघ–सिंह पटकन् जागचे उठले. त्यांनीं मोठ्यानें डरकाळ्या फोडल्या व प्रत्येकानें ताडताड त्याच्या बाजूस टिपटी झोंकल्या.

पण त्यापूर्वींच, तो तरुण सरदार त्या वर्तुळाबाहेर उडी मारून आलाही होता.

अगदीं विद्युत्गतीनें तो धांवत गेला होता नि तो हात–मोजा उचलून, तो अगदीं वायुवेगानेंच परत फिरला होता.

सर्वांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. त्या तरुणाचा गौरव झाला.

त्याची स्तुती करायला सारे त्याच्या भोंवती गोळा झाले. त्यांना वाटलें, 'आतां एवढं मोठं धाडस करून त्यानें तो हातमोजा परत आणल्यावर दुसरं आणखी राहिलं काय ?

' त्या लावण्यलतिकेपुढें त्यानें तो धरला, कीं, ती त्याचा नि त्या तरुणाचाही हंसतमुखानें स्वीकार करील ! त्या प्रेमीयुगलाचें आतां सुखद लग्न साजरं होईल ?'–असेंच वाटत होतें जमलेल्या साऱ्यांना !–

५

पण तो उमदा तरुण सरदार त्या सुंदर सरदारकन्येच्या पुढें क्षणभर धांपा टाकीत उभा राहिला; त्यानें तिच्याकडे एकदां निरखून पाहिलें; नि मग तो तिला म्हणाला-" केवळ स्वतःच्या मौजेखातर माझा जीव तूं एवढ्या भयंकर धोक्यांत घालायला सहजासहजीं तयार झालीस अं ! ठीक तर ! माझं तुझ्यावर केवढं प्रेम होतं याची कल्पना आलीच असेल तुला, आतां !-पण मला मात्र तुझ्या प्रेमाची या पुढें काडीइतकीही किंमत नाहीं. त्या तसल्या प्रेमाशिवायही मी सुखानें जगूं शकेन ! "

आणि एवढें म्हणून, तेवढ्या धोक्यांतून परत आणून आपल्या हातांत इतका वेळ धरलेला तिचा तो हातमोजा त्यानें रागानें व तुच्छतेनें खाडकन् तिच्या तोंडावर फेंकला...

पुढें अगदीं कांहीं एक न बोलतां, तो तिच्या समोरून निघाला; आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे टकमका पहात असलेल्या सभोंवारच्या गर्दींत मिसळून तो हां हां म्हणतां दिसेनासा देखील झाला ! !

माणसाच्या मनाच्या हालचाली मोठ्या गहन असतात.

★

# ४-चोराची चोरी-

१

एका शेटजींचा एक इमानी नोकर मोहरांनीं भरलेली पिशवी घेऊन एका गांवाहून दुसऱ्या गांवीं तांतडीनें चालला होता.

रस्त्यांत दाट जंगल होतें. अजून दोन मैल पल्ला गांठावयाचा होता. तेवढ्यांतच दाट काळोख पडला.

तो मनांत थोडा घाबरला होता. कारण त्याच्याकडे हत्यार वगैरे कांहीं नव्हतें; व त्या रस्त्याला त्या दिवसांत चोरांचा सुळसुळाट असे.

तो असा विचार करीत झपाझप पावलें टाकून रस्ता कांटत आहे, तोंच अगदीं जवळून बंदुकीचा आवाज आल्यामुळें तो दचकला.

तेवढ्यांत एक चोर बंदुक हातांत घेऊन त्याच्या रस्त्यांत समोरच उभा राहिला व म्हणाला-"जिवंत जायचं असेल पुढें, तर असेल नसेल तें माझ्याकडे दे!"

## २

नोकरानें प्रसंग ओळखला व. मोहरांची पिशवी चोराच्या हातीं दिली निमूटपणें.

पण ती दिल्यावर तो म्हणाला, "राव, धन्यांच्या एवढ्या मोहरा आपल्या हातीं तर जात आहेतच. पण पुन्हां मीच उलट आणखी चोर ठरेन, तेथें गेल्यावर—तेव्हां माझ्यासाठीं तरी एक गोष्ट करा....तेवढी भीक घालाच मला!"

मोंहरांची पिशवी ऐटींत छातीजवळ धरत चोर म्हणाला-"या काळोखांत तुझ्यासाठीं मला काय करतां येणार मला समजत नाहीं!-"

"का बरं?—सहज करतां येईल!" नोकर विनम्रपणें म्हणाला-"शेटजींची मोहराची पिशवी गेली. पण मी धडपड न करतांच ती गेली, असं पाहून शेटजी मला चोराचा साथीदार म्हणतील-माझ्यावर रागावतील नि मग माझी गरिबाची नोकरीही जाईल!-"

## ३

"मग मी काय करूं त्याला म्हणतोस?" जरा गोंधळून चोर म्हणाला.

"तुमच्याबरोबर मी थोडीफार झटापट केली असं तर शेटजींना दिसलं पाहिजे?" तो नोकर अगदीं साधेपणें म्हणाला-"ही मी माझी कांबळी पुढें करतों! आपण आणखी एकदोन गोळ्या मारा....मला सांगतां तरी येईल, तसं-"

चोरानें त्याच्यावर उपकार म्हणून त्याच्या कांबळीसमोर लागोपाठ बंदुकीचे दोन बार काढले. आणि मग तो म्हणाला, "झालं?–जा आतां–"

नोकर जायला म्हणून निघाला. पण त्यानें हळूच आपली कांबळी हातानें चाचपून पाहिली; तिच्यांत एकही भोंक पडलेलें नव्हते!

४

मागें वळून तो धिम्मेपणें चालूं लागलेल्या जवळच्या चोराला म्हणाला, "काय राव, असली कसली बंदूक तुमची? कांबळींत तर एकही भोंक पडलं नाहीं गोळीनें?"

चोर मोठ्यानें हंसून म्हणाला, "दादा! अरे तेंच तर माझं गुपित आहे! आतां हरकत नाहीं सांगायला तुला....अरे आहेत कुणा लेकाच्या बंदुकींत गोळ्या! वाटसरूंना घाबरवायला दारूचे बार तेवढे काढतों बंदुकींतून...."

"खरं कीं काय?" असें म्हणून ताडकन् उडी मारून त्या नोकरानें चोराच्या छाताडावर बसकण घेतली. त्याला चांगलें कुदकलें व मग मोहरांची पिशवी व त्याचें तें फसवें पिस्तुल देखील काढून घेतलें!

आणि त्या चोराला विव्हळत तसेंच टाकून तो गांवाकडे भरधांव पळत सुटला.

*

# ५-उपकाराची फेड-

१

आपल्या गाडींत धान्याचीं पोतीं भरून एक म्हातारा शेतकरी शहराकडे चालला होता. रस्ता खडकाळ नि खड्यांनीं भरलेला होता. बैलही आपले यथातथाच होते.

मोठ्या प्रयासानें, बैलांच्या व त्याच्या धडपडीनें, त्यानें अर्धा अधिक रस्ता कांटला व सरळ रस्त्याच्या अगदीं तोंडाशीं तो येऊन पोहोंचला.

बैलवाट मोठया रस्त्याला मिळत होती तिथें एक मोठा खड्डा होता; व रस्ता उंच असल्यामुळें तेथें त्याला चढण चढवून गाडी वर न्यावयाची होती.

तो प्रयत्न करतांना रोडक्या बैलांना व त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याला गाडी काबूंत ठेवतां येईना.

शेवटीं, ती मागें मागें घसरत त्या खड्डयांत जाऊन बसली व आंतल्या गोणींपैकीं दोन त्या मोठ्या धक्क्यानें खालीं उडाल्या.

## २

म्हाताऱ्यानें गाडी वर ढकलण्याचा प्रयत्न केला. पडलेल्या दोन्ही गोणी गाडींत टाकण्याचा आटोकाट यत्न केला. पण कांहीं जमेना.

शेवटीं, निराश होऊन तो रस्त्यावर जाऊन बसला.

लोक रस्त्यानें जात येत होते. प्रथम एक दोघांना त्यानें मदतीला बोलवलें. पण जो तो आपल्याच गडबडींत! त्याला कोण मदत करतो?.... त्या अनुभवानें तो कपाळावर हात घेऊन स्वस्थ बसला.

तेवढ्यांत, समोरून एका पांढऱ्या शुभ्र उमद्या घोड्यावर बसलेला एक राजबिंडा पुरुष येत असतांना त्याला दिसला. त्याला पाहून तर शेतकऱ्यानें हळूच मान खालीं घातली.

'रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांची मदत मिळाली नाहीं! तर या सरदार आसामीची मदत कसली मिळते आपल्याला? आणि आपण मागणार तरी कशी मदत त्याच्याकडे?'—खालीं मान घालून म्हातारा विचार करीत होता.

## ३

"काय झालंय काय, आजोबा?"–एकदम खणखणीत आवाज जवळून ऐकूं आल्यामुळें शेतकऱ्यानें दचकून वर पाहिलें. तोच तो राजबिंडा मनुष्य आपल्या रुबाबदार पांढऱ्या घोड्यावरून शेतकऱ्याजवळ खालीं उतरत होता.

"गाडी खड्डयांत आडलीय!" शेतकरी लाजेनें खालीं पहात संकोची स्वरांत म्हणाला, "नि दोन पोती बीं खालीं उडालीयात्...."

त्या पुरुषानें आपला अंगरखा घोड्यावर काढून ठेवला व तो गाडी–रस्त्यावर उतरला.

"चला या, आजोबा!" तो गाडीच्या चाकाला हात घालीत शेतकऱ्याला म्हणाला, "मी करतों मदत तुम्हांला!"

दचकून जागचे उठत शेतकरी घाबऱ्या स्वरांत म्हणाला, "ह्यें ह्यें काय, धनी! आपलं काम न्हवं तें!"

"काम सगळ्या माणसांचंच आहे! चला तुम्ही!" तो चाकाला नेट लावून म्हणाला.

## ४

शेतकऱ्यानें धांवतच जाऊन दुसऱ्या चाकाला नेट लावला व बैलांना चुचकारलें.

मिनिटभराच्या प्रयत्नानें बैलांनीं गाडी वर ओढली; मग दोन्ही पोतीं दोघांनीं मिळून उचलून गाडींत चढवलीं.

शेवटीं अंगरखा अंगावर चढवून त्या राजबिंड्या माणसानें आपल्या घोड्यावर टांग टाकली.

## ५

शेतकरी म्हाताऱ्याच्या डोळ्यांत कृतज्ञता पुरेपूर भरली होती.

घोड्याच्या एक दोन टांपा ऐकूं येतांच, तो भानावर येऊन त्या घोडेस्वाराला म्हणाला,–"धनी! आपल्याला फार तसदी झाली. माझ्यावर लय् उपकार झाले आपले !–कसे फेडूं मी ते ?"

चालतां चालतां घोडा खेंचून तो घोड्यांवरचा पुरुष गंभीर हंसून म्हणाला–" फारच सोपं आहे तें !–ज्या ज्या वेळीं कोणी असा प्रसंगांत सापडलेला दिसेल, त्या त्या वेळीं तुम्ही त्याला मदत केलीत, कीं, माझे उपकार आपोआप फिटतील !–"

एवढें म्हणून त्यानें घोड्याला टांच मारली.

★

# ६–फक्त परिस्थितीचा प्रश्न–

१

डिओमेडिस नांवाचा समुद्रांत चांचेगिरी करणारा शूर नावाडी होता. त्यानें एका गलबताच्या मालकीवर खूप जहाजांची लुटालूट केली होती. कित्येक जहाजें जाळलीं होतीं.

शेवटीं त्याला पकडून राजदूतांनीं इतिहासांत गाजलेला राजा ॲलेक्झँडर याच्यापुढें उभें केलें.

त्याच्यासारख्या यःकश्चित् माणसानें, समुद्रावर फिरणाऱ्या सर्व माणसांना सळो की पळो केलेलें पाहून ॲलेक्झँडर राजा रागानें त्याला म्हणाला–" हें कसलं धाडस आरंभलं आहेस तूं ? तुला कांहीं भय-भीती लाज–लज्जा आहे कीं नाहीं ?"

२

तो चांचा कैदी शूर होता. तसाच चाणाक्षहि होता–

पूर्वी इतक्याच आदबीनेंच ॲलेक्झँडर राजाला तो म्हणाला— "राजे, आपण मला हा प्रश्न विचारण्यापेक्षां स्वतः आपल्याच

कोणी तरी विचारायला पाहिजे ! निदान आपण स्वतःच तो प्रश्न आपल्याला विचारलात तर बरं होईल. मला वाटतं !—"

राजानें त्या शब्दांनीं त्याला रागांत चमकून विचारलें—"काय म्हणालास ?"

"हो महाराज !" तरी तो धीटपणेंच पुढें म्हणाला, "माझ्याकडे तर एकच गलबत आहे. माझ्याकडून जगाला उपद्रव होत असला तर तो किती ?–अगदीं एवढासा....मर्यादित !....पण आपल्याकडे मोठमोठ्या जहाजांचे तांडेच्या तांडे आहेत. पदरीं एवढी हजारानीं माणसें आहेत. नि आपणहि समुद्रावर मनमानेल तसा संचार करत फिरतां आहां. लोकांना जिंकता आहां !....पण मी लहान म्हणून मला चोर ठरवून आपल्या सिंहासनासमोर मला तुम्ही कैद करून आणलें. आणि आपल्याला लोक जगज्जेते, पराक्रमी म्हणतात. नशिबाचं वारं जरा जरी फिरलं तरी आपली ठिकाणें उलट सुलट होतील !

राजाला त्याचा तो धीटपणा व तो युक्तिवाद इतका आवडला, कीं, त्यानें डिओमेडिसला आपल्या पदरीं मोठा दर्यासारंग म्हणून ठेऊन घेतलें व त्याच्या स्वैर क्रूर चांचेगिरीऐवजी त्याची आपल्या मोहिमांकडे मदत घेतली.

★

# ७-चाणाक्षपणा—

१

ॲलेक्झँडर राजाचा बाप फिलिप याला त्याच्या प्रधानानें एकदां सांगितलें कीं, दरबारचा एक सरदार त्याच्या विरुद्ध कट करीत आहे. तेव्हां राजानें विचारलें, "त्यावर उपाय काय ?"

प्रधानानें सांगितलें, "त्याला तुरुंगांत टाकावें ?"

पण प्रधानानें पुन्हां पुन्हां सांगूनही फिलिफ राजानें त्या गोष्टीला मान्यता दिली नाहीं. तो म्हणाला, "माझ्या शरिराचा एखादा भाग रोगट झाला तर मी तो काय कापून टाकावा? त्यापेक्षां त्याच्यावर औषधोपचार करणेंच योग्य नाहीं का?"

२

तेव्हां फिलिफ राजानें त्या कट करणाऱ्या सरदाराला बोलावून आणले. त्याचा अधिक मान केला. त्याला देणग्या दिल्या; आणि त्याला अधिक जबाबदारीचें काम दिलें. त्याच्यावर नजरही ठेवली.

त्याचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, त्या सरदाराच्या मनांतील असंतुष्टता कमी झाली. राजा विरुद्ध कट करून मोठे होण्याची त्याला आतां जरूर नव्हती. त्यामुळें उलट तो फिलिफ राजाच्या दरबारांतला अतिशय महत्वाचा व स्वामिनिष्ठ सरदार बनला.

★

# ८-त्यागानें दया-

१

ओरेसेस व फिलाडेस नांवाचे दोघे मित्र होते. ते अगदीं जुळ्या भावांप्रमाणें दिसत व त्यांचें भावापेक्षांहि एकमेकांवर अधिक प्रेम होतें.

एका जुलमी सरदारानें एकदा ऑरेसेसला पकडलें, आपल्या खासगी द्वेषामुळें तो त्याला ठार मारणार होता. सेवक त्याला सुळी द्यायला घेऊन जात होते.

फिलाडेसला त्यामुळे फार वाईट वाटलें. त्यानें स्वतःचा जीव धोक्यांत घालून आपल्या मित्राला बचावण्याचें ठरविलें. तो धांवत धांवत

त्या सेवकांबरोबरच त्या जुलमी सरदारापुढें गेला व मित्राचा जीव वांचवण्यासाठीं सांगूं लागला-" तो ऑरेसेस नव्हे--मी ऑरेसेस !-फिलाडेस उगीच नाहक बळी पडत आहे, महाराज !—"

२

ऑरेसेसनें तें पहातांच तो घाबरला व ओरडूं लागला-"त्याचं ऐकूं नका—तो खोटं सांगत आहे-मीच ऑरेसेस !"

सरदाराचा गोंधळ झाला. तेवढ्यांतच, या दोघा मित्रांची एकमेकांना वांचवण्यासाठीं भांडणें सुरू झालीं. दोघेही आपणच ऑरेसेस आहोंत असें ओरडून ओरडून सरदाराला सांगत होते.

एकमेकांच्या मैत्रीसाठीं मृत्यूसारख्या गोष्टीवर त्या दोघांना तसें भांडतांना पाहून, तो जुलमी सरदारच खजील झाला; व त्याचं हृदय द्रवून त्यानें दोघांनाही अभय देऊन मोकळें सोडले.

★

अमर ज्योति वाङ्मय
संस्थेचे कायम ग्राहक व्हा.

अमर ज्योति वाङ्मय
१ कुतूहल भाग १-२
२ माणसाचें शेंपूट.
[ शास्त्रीय-वाङ्मय ]
जरूर जरूर वाचा !

# लहान मुलांकरितां सुंदर पुस्तकें

| | |
|---|---|
| ले.–सौ. विजयादेवी वाळिंबे | आणे |
| गौरीशंकर | ४ |
| वळवाचा पाऊस | ४ |
| बचंभट | ४ |
| उंटावरला शहाणा | ४ |
| कवयित्री–काशीताई नाटेकर | |
| फुलांचा कुरकुला | ६ |
| ले.–वि. कृ. नेरुरकर, बी. ए., एस्. टी. सी. | |
| माणूस आणि पशु | ६ |
| ले.–शकुंतला लिमये | |
| तशी काय झालं ! | ४ |
| मग किनई | ६ |
| ले.–बाळ ओझरकर | |
| चंद्रमोहन व इतर गोष्टी | ६ |
| ले.–सुभाष सुखटणकर | |
| ओटीवरील गोष्टी | ६ |
| ले.–तु. ता. सावंत, बी. ए., एस्. टी. सी. | |
| हसले ते फसले | ४ |
| प्रसाद | ४ |
| ले.–य. वि. ठोसर, एम्. एस्सी. | |
| वीरबाला व इतर गोष्टी | ६ |
| ले.–शं. वि. तानवडे | आणे |
| पृथ्वी नि माणूस | ६ |
| ले.–वसंत केमकर | |
| नलूच्या गोष्टी | ६ |
| ले.–शशिनाथ | |
| नंदापरी | ५ |
| ले.–बा. अ. देसाई | |
| चांदा गोन्हा | ८ |
| ले–रा. दि. देसाई | |
| तिसरी भाकरी | ३ |
| ले.–रामतनय | |
| बाळू नि बगडी भाग १ ला | ६ |
| पु. दा. कुलकर्णी कृत | |
| अक्षरांचा खेळ (अनेक मुळाक्षरांची पेटी) | १ रु. |

## प्रौढ मुलांसाठीं

| | |
|---|---|
| ले.–के. ग. अळूरकर, एम्. ए. | |
| अग्रपूजा व इतर गोष्टी | १२ |
| दिव्य विहंग | १ रु. |
| ले. अ. वा. मराठे | |
| न्या. रानडे | १। रु. |
| कवयित्री–काशीताई नाटेकर | |
| गवाक्षगीत | १० |
| आपुलकी | १० |

**केमकर आणि मंडळी,**

पब्लिशर्स, बुकसेलर्स व स्टेशनर्स, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई नं. ४

ग्रँटरोड ब्रँच—पन्नालाल टेरेसेस, लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७